cmyk



दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... www.epaper.rajyaloktantra.com

होळीच्या या पवित्र अग्नीमध्ये निराशा, दारिद्र्य, आळस यांचे दहन होवो आणि सर्वांच्या आयुष्यात आनंद, सुख, आरोग्य व शांती नांदो...

–संपादक

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ०३ | अंक–३४२ | रविवार, दि.२४ मार्च २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# कांदा अनुदान निधी वितरणास मान्यता!

## निवडणुकिच्या पार्श्वभुमीवर सरकारचा शेतकऱ्यांना खूष करण्याचा प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

**एकीकडे केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदीला सरकारने पुढील आदेशापर्यंत मुदत वाढ दिली आहे. तर दुसरीकडे राज्य सरकारने लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर नाराज शेतकऱ्यांना खुश करण्यासाठी कांदा अनुदान रक्कम वितरणासाठी मंजूरी दिली आहे. २०२३ च्या हिवाळी अधिवेशनातील ३०१ कोटी ६६ लाख ९३ हजार कोटींपैकी ३० टक्के रक्कम म्हणजे ९० कोटी ४९ लाख १४०० हजार रक्कम वितरीत करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. याबद्दलचा शासन निर्णय राज्य सरकारने काढला आहे. अनुदान लाभार्थींच्या याद्या ग्रामसभेसमोर वाचून फलकावर प्रसिद्ध करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. त्यामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळणार आहे.**

२०२३ च्या जानेवारी–फेब्रुवारीत कांद्याचे दर पडले होते. राज्यात कांदा उत्पादकांमध्ये प्रचंड आक्रोश धुमसत होता. त्यात अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुद्दा चांगलाच गाजला होता. शेवटी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी याच अधिवेशनात लेट खरीप हंगामातील लाल कांद्याची कृषी उत्पन्न बाजार समितीत, खासगी बाजार समितीत आणि थेट पणन वा नाफेडकडे विक्री करणाऱ्या कांदा उत्पादकांना प्रति क्विंटल



३५० रुपये आणि जास्तीत जास्त २०० क्विंटल मर्यादेपर्यंत अनुदान देण्याची घोषणा केली. २०२३ च्या विधिमंडळ पावसाळी अधिवेशनात ५५० कोटीच्या रक्कमेला पुरवणी मागणीतून मंजूर दिली. त्यापैकी ४६५ कोटी ९९ लाख रुपये वितरणास मान्यता दिली. दरम्यान वित्त विभाग आणि पणन विभागाचे कांदा अनुदान रक्कमेवरून खटके उडाले. अटीशर्थींचा भडिमार करण्यात आला. अनुदान वाटपासाठी पणन विभागाने चालढकल केली गेली. त्यामुळे गेल्यावर्षीच्या हंगामात जाहीर केलेल्या अनुदानासाठी वर्ष उलटून गेलं तरीही शेतकऱ्यांना वाट पाहावी लागली.

अखेर २०२३ च्या पावसाळी अधिवेशनातच कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदानासाठी एकूण ८५१ कोटी ६६ लाख ९३ हजार ६६३ रुपयांची आवश्यकता असल्याचं संगणक ◀◀ पान २ वर

## आंबेडकर यांचा महाआघाडीला २६ मार्च पर्यंत अल्टीमेटम

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाआघाडीची वंचित बहुजन आघाडीबरोबर सातत्याने जागा वाटपाची चर्चा सुरु आहे. परंतु अद्यापतरी तोडगा निघू शकला नाही. दरम्यान, प्रकाश आंबेडकर यांनी आम्ही २६ मार्च पर्यंत महाविकास आघाडीची वाट बघणार आहोत, त्यानंतर वंचित बहुजन आघाडी आपली भूमिका जाहिर करेल असे म्हटले आहे.**



काँग्रेसने तिसरी यादी जाहिर केल्यानंतर वंचितची भूमिका मांडण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत प्रकाश आंबेडकर बोलत होते. आगामी लोकसभा ◀◀ पान २ वर

### कोल्हापुरात शाहू महाराजांना वंचितचा पाठिंबा

कोल्हापूर मतदार संघात शाहू छत्रपती यांना वंचितचा पाठिंबा असेल, अशी मोठी घोषणा शनिवार (दि.२३) पत्रकार परिषदेत वंचितचे डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी केली. ते असेही म्हणाले की, आमचं टार्गेट भाजप आहे. काँग्रेसला आम्ही सात जागांवर पाठिंबा देणार. काँग्रेसेने त्यांच्या सात जागा आम्हाला कळवाव्यात. दरम्यान, काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी आपल्या '' खात्यावर पोस्ट करत म्हटलं आहे, '' आदरणीय श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिल्याबद्दल डॉ. प्रकाश आंबेडकरजी आपले धन्यवाद . समतेचा विचार आणि संविधान टिकवण्यासाठी आपला पाठिंबा आम्हांला निश्चितच बळ देईल. तसेच राज्यात महाविकास आघाडीतही आपण सहभागी व्हावे, ही अपेक्षा.

# लेकीला मिळाले जिल्ह्यातील श्रध्देय गडांचे आशीर्वाद

## श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, भगवान भक्तीगड, नारायणगडावर पंकजाताई मुंडे नतमस्तक पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी एकमुखी पाठिंब्याचा दिला शब्द ; सावरगावला झाली पेढेतुला

**बीड । प्रतिनिधी**

**बीड लोकसभेच्या उमेदवार तथा भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी काल व आज जिल्हयातील श्रध्देय गडांच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. जिल्हयातील जनतेच्या ऋणात नेहमी असावे, त्यांचेवरील प्रेम कधीही कमी होऊ नये अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. गड परिसरातील ग्रामस्थांनी देखील त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याचा शब्द यावेळी दिला.**

लोकसभेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पंकजाताई मुंडे शुक्रवारी बीडमध्ये आल्या. धामणगांव इथं जल्लोषात स्वागत झाल्यानंतर काल रात्री त्यांनी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर जाऊन श्रध्देय वामनभाऊ, राष्ट्रसंत भगवान बाबा, कुसळंब येथील खंडेश्वर यांचे



आशीर्वाद घेतले. आज सकाळी धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेल्या श्रीक्षेत्र नारायणगडावर जावून त्यांनी संत नगद नारायण महाराजांचे आशीर्वाद घेतले. दोन्ही गडावर त्यांना महंत शिवाजी महाराज, विठ्ठल महाराज यांनी आशीर्वाद दिले.

### ग्रामस्थांनी दिला एकमुखी पाठिंब्याचा शब्द

गहिनीनाथ गड, सावरगाव येथे पं ग्रामस्थांनी पंकजाताईंचे वाजतगाजत भव्य स्वागत केले. इथं त्यांची पेढेतुलाही करण्यात आली. यावेळी संवाद साधताना त्या म्हणाल्या, प्रथा, परंपरे प्रमाणे मी गडावर आले आहे, ही परंपरा मुंडे साहेबांपासून आहे. मला उमेदवारी जाहीर झाली, मुंडे साहेबांनी सांभाळेल्या सर्वांना सांभाळण्यासाठी लोकसभा लढवण्याचा मी निर्णय घेतला. मंत्री असताना सर्व गडांना निधी दिला, पुढेही जिल्हयाचा विकास करण्यासाठी जीवाचं रान करेल. तुमचं माझेवर खूप प्रेम आहे,हे कधीही कमी होऊ नये.अफवावर विश्वास ठेवू नका.माझे यश हे माझं नाही. तुमचं आहे. कारण तुमच्यासाठी मला काम करायचं आहे, त्यासाठी मला आशीर्वाद द्या असं पंकजाताई म्हणाल्या. यावेळी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, आ. सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

# मविआचे ठरले; बजरंग सोनवणे आजपासून लागले कामाला

## दोन दिवसात उमेदवारी होणार जाहीर; नांदुरघाट सर्कलमधून करणार दौऱ्याला सुरुवात

**बीड, केज । प्रतिनिधी**

**भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी प्रचाराच्या पहिल्या टप्प्याला सुरूवात केली असली तरी महाविकास आघाडीकडून अद्याप उमेदवार निश्चित झालेला नाही. मात्र शरद पवारांनी बीडसाठी उमेदवार कोण द्यायचा आहे? हे ठरवले असून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला सोडचिठ्ठी देऊन नुकतेच पवारांच्या गोटात दाखल झालेले बजरंग सोनवणे हे रविवारपासून कामाला लागले आहेत. नांदुरघाट सर्कलमधून ते आपल्या जनसंपर्क दौऱ्याला सुरुवात करणार असून येत्या २–३ दिवसात अधिकृतपणे उमेदवार जाहीर होणार असल्याचे समजते.**

बीड लोकसभेच्या निवडणुकीकडे संपुर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांना महायुतीची उमेदवारी मिळाली आहे. दि. २२ मार्च पासून त्या बीड जिल्ह्यात तळ ठोकून आहेत. या तीन दिवसीय दौऱ्यात त्यांनी महायुतीमधील नेत्यांच्या घरी भेटी दिल्या. प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात त्यांनी आघाडी घेतली असून दुसरीकडे महाविकास आघाडीकडून उमेदवार नेमका कोण असेल यावरुन अजूनही संभ्रम होता. मात्र शरद पवार यांनी बीड लोकसभा मतदार संघासाठी कोण उमेदवार द्यायचा हे ठरवले असल्याचे समजते. अलिकडच्या काळात बजरंग सोनवणे आणि ज्योतीताई



मेटे यांचे नाव आघाडीवर होते. त्यात मेटे यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा झाली. मात्र शरद पवार यांच्या सोबतची मेटे यांची बोलणी फिसकटली असल्याची खात्रीलायक माहिती असून बजरंग सोनवणे यांच्या गळ्यात आता बीडच्या उमेदवारीची माळ पडणार हे जवळजवळ निश्चित झाले आहे.

बजरंग सोनवणे यांना यापुर्वी २०१९ मध्ये लोकसभा निवडणुक लढवल्याचा अनुभवही आहे. त्यावेळी त्यांनी ५ लाख ९ हजार ८०७ मते घेतली होती. ◀◀ पान २ वर

# पंकजा मुंडेंच्या विजयासाठी आ.पवार लावणार तगडा फिल्डींग

## निवासस्थानी भेट दिल्यावर नाराजीनाट्यावर पडदा; पंकजाताई मोठ्या मताधिक्यांने विजय होतील–आ. पवार

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराईचे आमदार लक्ष्मण पवार हे भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचे काम करतील की नाही? याविषयी तर्कवितर्क लावण्यात येत होते. आता या चर्चांना पुर्णविराम मिळाला असून पंकजा मुंडे यांच्या विजयासाठी आ. पवार हेच गेवराईत तगडी फिल्डिंग लावणार असल्याचे दिसते. शनिवारी पंकजा मुंडे व खा. प्रितमताई मुंडे यांनी आ. पवार यांच्या निवासस्थानी भेट देऊन बऱ्याच वेळ चर्चा केली. ही चर्चा सकारात्मक झाल्याने गेल्या ५–६ वर्षातील आ. पवार यांची नाराजी दुर झाल्याचे**



**दिसले. पंकजा मुंडे या मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास यावेळी आ. लक्ष्मण पवार यांनी व्यक्त केला.**

गेल्या पाच वर्षापासून नाराज ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२३ मार्च २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १०.५० क्विंटल | २,२०१ | २,४०१ | २,३२० |
| ज्वारी/हायब्रिड :७८.०० क्विंटल | १,६०० | ३,०९० | २,३८१ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,३०० | ९,३०० | ९,३०० |
| तूर :६.५० क्विंटल | ७,२०० | ९,५०० | ८,९०६ |
| उडीद : २.०० क्विंटल | ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: २.०० क्विंटल | २,६५० | २,८०१ | २,७१६ |
| चिंचोका/लोकल: ३.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| सोयाबीन: १.५० क्विंटल | ४,४०० | ४,४०० | ४,४०० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,३५२ | ५,३५२ | ५,३५२ |

# शेतकऱ्यांसाठी चुकीचे निर्णय घेणाऱ्यांना सत्तेपासून बाजूला करा –शरद पवार



**इंदापूर । वृत्तसंस्था**

**ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण नाही. महागाई, बेकारी, भ्रष्टाचार वाढत आहे. हे घालवायचे असेल तर चुकीचे निर्णय घेणाऱ्यांना सत्तेपासून बाजूला करणे, हे तुमचे आणि माझे कर्तव्य आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी इंदापूर येथील शेतकरी मेळाव्यातून भाजपावर हल्लाबोल केला.**

इंदापूर येथे शनिवारी शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, खासदार सुप्रियाताई सुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा खासदार संजय राऊत, आमदार रोहित पवार उपस्थित होते. शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण नाही. महागाई, बेकारी ◀◀ पान २ वर

## मास्को दहशतवादी हल्ल्यात मृत्युंची संख्या ११५ वर

**मास्को । वृत्तसंस्था**

सशस्त्र बंदूकधाऱ्यांनी रशियातील राजधानी मॉस्को येथील क्रोकस सिटी या कॉन्सर्ट हॉलमध्ये केलेल्या हल्ल्यात मोठी जीवितहानी झाली. या हल्ल्यातील मृतांचा आकडा ११५ वर गेला आहे. तर १८७ हून अधिक जखमी झाले आहेत. रशियन अधिकाऱ्यांनी शनिवारी सांगितले की, मृतांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. या हल्ल्यात शनिवार रात्री पर्यत ११५ जणांचा मृत्यू झाला असल्याचे रशियन तपास यंत्रणेने म्हटले आहे.

मॉस्को जवळील क्रोकस सिटी या प्रसिद्ध कॉन्सर्ट स्थळाच्या कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या हल्ल्याची जबाबदारी ने स्वीकारली आहे. हल्लेखोरांनी बंदूक आणि स्फोटकांनी हल्ला केला. यात किमान ११५ जण ठार झाले आणि अनेकजण जखमी झाले. या हल्ल्यात जखमी झालेल्यांपैकी ४४ जणांची प्रकृती चिंताजनक असून त्यात दोन मुलांचा समावेश असल्याचे रशियाच्या आरोग्य मंत्रालयाने जाहीर केले आहे. मंत्रालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, ''क्रोकस येथील ◀◀ पान २ वर

# निवडणूक रोखे घोटाळ्याची एसआयटीद्वारे चौकशी करा : काँग्रेसची मागणी

## ३८ कॉर्पोरेट समुहांनी २००४ कोटी रुपयांची देणगी भाजपला दिली, त्यांना ३.८ लाख कोटीची कंत्राटे मिळाली

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**निवडणूक रोख्यांबाबत स्टेट बँकेने जाहीर केलेल्या तपशीलानंतर मुख्य विरोधी पक्ष काँग्रेसने या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली पारदर्शक चौकशी व्हावी, अशी मागणी केली आहे. एमएसपीला कायदेशीर हमी न देणाऱ्या मोदी सरकारने निवडणूक रोख्यांच्या मदतीने लाचखोरीला कायदेशीर दर्जा दिला असल्याचा प्रहारही काँग्रेसने केला आहे.**

काँग्रेस सरचिटणीस जयराम रमेश यांनी शनिवारी पक्ष मुख्यालयात पत्रकार परिषद घेऊन सत्ताधारी भाजपवर कडाडून टिकास्त्र सोडले. निवडणूक रोख्यांचा तपशील देण्यासाठी स्टेट बँकेने सर्वोच्च न्यायालयाकडे ३० जूनपर्यंत मुदत मागितली होती. काँग्रेसच्या सहकाऱ्यांनी पाच ओळींचा संगणक प्रोग्राम लिहून पंधरा सेकंदात कोणत्या कंपनीने किती देणग्या कोणत्या पक्षाला दिल्या याची माहिती समोर आणली. काँग्रेस पक्ष खासगी कंपन्यांच्या विरोधात नाही, असे स्पष्टीकरणही जयराम रमेश यांनी यावेळी दिले. विकासदर कायम राखण्यासाठी गुंतवणूक आवश्यक आहे. मात्र निवडणूक रोख्यांमध्ये खासगी कंपन्यांनी दिलेली देणगी ही गुंतवणूक नसून भाजपने कंपन्यांचा गैरवापर केला आहे, असा आरोप जयराम रमेश यांनी केला. जयराम रमेश म्हणाले, हा संपूर्ण गैरव्यवहार चार प्रकारांचा आहे. देणगी द्या आणि व्यवसाय मिळवा हा लाचखोरीचा प्रिपेड प्रकार आहे. त्यात ३८ कॉर्पोरेट समुहांनी निवडणूक रोख्यांद्वारे २००४ कोटी रुपयांची देणगी भाजपला दिली. त्यांना ३.८ लाख कोटी रुपयांची १७९ कंत्राटे भाजप सरकारकडून मिळाली. याच श्रेणीत ५५१ कोटी रुपयांची देणगी दिल्यानंतर तीन महिन्यात कंपन्यांना १.३२ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प मिळाल्याकडे जयराम रमेश यांनी लक्ष वेधले. कंत्राटे मिळविण्यासाठी लाच द्या हा पोस्टपेड प्रकार असून त्यात आधी ६२ हजार कोटी रुपयांची कंत्राटे, प्रकल्प केंद्र, व भाजपची सत्ता असलेल्या राज्य सरकारांद्वारे मंजूर करण्यात आले. त्यानंतर ५८० कोटी रुपयांची लाच निवडणूक ◀◀ पान २ वर

cmyk

२ राज्य लोकतंत्र संपादकीय.... रविवार, दि.२४ मार्च २०२४

## अग्रलेख

# नैतिकता निश्चीत ढासळली पण कोणाची ?

कुठल्याही क्षेत्रात मतभिन्नता नाही तर त्या क्षेत्रात वावरणाऱ्या लोकांची विचारशून्यता हीच खरी समस्या असते. काही लोक फक्त संधीसाधू असतात. हा संधीसाधूपणा हीच अत्यंत चिंतेची बाब आहे, असे मत केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. परखड वक्ते ही गडकरी यांची ओळख मानली जाते. तथापि काहीच लोक संधीसाधू असू शकतील का? राजकारणात तर वरपासून खालपर्यंत संधिसाधूपणाच पाझरताना आढळतो. काही लोक समोर आलेली संधी साधत असतील पण राजकारणी तर त्यांचे इप्सित साधण्यासाठी संधी निर्माण करतात.

या गदारोळात समाजात मात्र फक्त संभ्रमावस्था निर्माण होत राहते. समाज मूल्यहीन होत चालल्याचे नेहमीच बोलले जाते. नीतिमुल्यांची चाड कोणालाही राहिलेली नाही अशी टीका जाणते करतात. पण त्याचा दोष सामान्य माणसांच्या माथी मारला जाऊ शकेल का? सामान्य माणसे पापभिरू असतात. अनेकांना त्यांच्या दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असते. रोजी कमावली तरच संध्याकाळी चूल पेटेल अशी अनेकांची परिस्थिती आढळते. रोजगाराच्या शोधात अनेकांना भटकावे लागते. कंबरडे मोडणारी महागाई, महागडे होत चाललेले उच्च शिक्षण आणि वैद्यकीय उपचार, किमान दोन मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी, वाढती बेरोजगारी यामुळे सामान्य माणसांची चहुबाजूने कोंडी झालेली आहे. तरीही मुलांनी वाट्टेल त्या मार्गाने पैसे कमवावेत आणि मनमानी आचरण करावे अशी कोणाचीच इच्छा नसते. त्याऐवजी मुलांनी मूल्ये जपावीत. कष्ट करून चांगल्या मार्गाने पैसे कमवावेत. मेहनतीचे फळ घ्यावे. चांगले काम करून समाजात आदर प्राप्त करावा अशीच बहुसंख्य सामान्य माणसांची इच्छा असते. नव्हे तसेच संस्कार मुलांवर केले जातात. कष्ट केल्याशिवाय फळ मिळत नाही. जे आपले नाही ते घ्यायचे नाही हेच मुलांना शिकवले जाते. लहान असेपर्यंत मुलांवर त्यांच्या पालकांचा प्रभाव असतो. पण हीच मुले जेव्हा समाजात वावरतात तेव्हा अनेक ठिकाणी त्यांना नेमके त्याच्या उलट चित्र आढळते. सगळीकडे संधिसाधूपणाच शिरजोर झाल्याचे त्यांना दिसते. मूल्ये तेवढी लोकांनी सांभाळावीत आणि ते ज्यांना आदर्श मानतात ते मात्र संधिसाधूपणा करताना अजिबात संकोच करत नाहीत हेही त्यांना दिसते. यामुळे त्यांचा कमालीचा गोंधळ उडणे स्वाभाविक नाही का? राजकारणात संधिसाधूपणाच शिरजोर होत चालला आहे असे सामान्य लोकांचे ठाम मत होत चालले आहे ते शंभर टक्के चूक ठरवले जाऊ शकेल का? त्यामुळे प्रामुख्याने युवा पिढीत, मूल्ये चांगली की संधिसाधूपणा असा वैचारिक संघर्ष वाढत आहे आणि हीच संभ्रमावस्था समाजाला अराजकतेकडे वेगाने ढकलते हे राजकारण्यांच्या लक्षात तरी येत असू शकेल का? ज्याची कुचिन्हे जागोजागी अनुभवास येतात. नातेसंबंधांमध्ये संघर्ष, मैत्रीत अविश्वास, कुटुंबांमध्ये संपत्तीवरून भाऊबंदकी आढळते. संघर्ष, विरोधाभास आणि दुटप्पीपणाच्या पायावर उभा राहणारा समाज सुदृढ म्हटला जाऊ शकेल का? सामाजिक अराजकता अनेकार्थांनी परवडणारी नाही. ज्या समाजाच्या मतदानावर सत्तेचे इमले बांधले जातात त्या समाजाची गुणवत्ता वेगाने ढासळण्याची भीती जाणते का व्यक्त करतात याची दखल समाजाचे कर्तेधर्ते म्हणवणारे राजकारणी कधीतरी घेतील का?

## आज्ञात व्यक्तीने कडब्याची गंज पेटवून दिली

शिरूर । प्रतिनिधी

**दुष्काळामध्ये घोड्यांना चारा खाऊ घालण्यासाठी रात्रंदिवस कष्ट करून गोळा केलेला एक हजार ते अकराशे पेंढ्यांची अज्ञात व्यक्तीने पेटवून दिल्याची घटना शुक्रवार दि. २२ मार्च मध्यरात्री फुलसांगवी येथे घडली असून मुक्या प्राण्यांच्या तोंडचा चारा पेटवून देणाऱ्या या दुष्कृत्य करणाऱ्या त्या व्यक्तीबाबत परिसरामध्ये मोठा संताप व्यक्त केला जात आहे.**



शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी येथील रहिवासी असलेले इसाक सुलेमान सय्यद हे आपल्या दावणीला घोडे सांभाळत असून, या घोड्याचे वरातीमध्ये, नवरदेवपरण्या पुढे नृत्य दाखवून, नवरदेवाची घोड्यावर मिरवणूक काढून मिळालेल्या कमाई मधून आपला उदरनिर्वाह करत आहेत.आर्थिक परिस्थिती दुर्बलतेची असूनही त्या घोड्यांना संभाळणे हे त्यांच्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा करणारे काम आहे. यावर्षी तालुक्यामध्ये सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने या घोड्यांना चारा मिळवणे या परिवारासाठी जिकरीचे झाले होते म्हणून इसाक सय्यद यांचे कुटुंब गेल्या काही दिवसापासून उन्हातान्हाची तमा न करता या घोड्यांना वैरण मिळवण्यासाठी घरच्या आणि दुसऱ्याच्या शेतामध्ये राबवत होते. आपल्या कष्टातून त्यांनी सुमारे १००० ते ११०० त्यांनी कडवा गोळा गोळा करून घराच्या पाठीमागे गंज लावून ठेवली होती. ही गंज शुक्रवार दि.२२ मार्च रोजी मध्यरात्री १२ ते १२:३० च्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने पेटून दिली. या आजी मध्ये जवळपास सर्वच कडवा जळून खाक झाला आहे. आजच्या बाजार या कडब्याची किंमत २५ ते ३० हजार रुपये एवढी जरी असली तरी त्या दुष्काळामध्ये दावणीच्या या जनावर आता काय खाऊ घालावे हा प्रश्न सय्यद परिवारावर येऊन पडला आहे. मुक्या प्राण्यांच्या मुखातला चारा पेटवून देऊन केलेल्या दुष्कृत्याच्या विरोधात परिसरातून तीव्रता प्राप्त केलाआहे.

# इंदिरा गांधी यांच्या जादुई करिष्मा -देशात काँग्रेसची जोरदार वापसी

## वारी दिल्लीची रणसंग्राम लोकसभेचा

भारतात १ ते १० मार्च १९७१ दरम्यान पाचव्या लोकसभेचे सदस्य निवडण्यासाठी सार्वत्रिक निवडणुका झाल्या . १९४७ मध्ये स्वातंत्र्यानंतरच्या त्या पाचव्या सार्वत्रिक निवडणुका होत्या.दरम्यान याच काळात काँग्रेस पक्षात धुसफूस वाढली.१९६७च्या निवडणुकीनंतर इंदिरा गांधी यांनी कामाची पद्धत बदलली.काँग्रेस पक्ष आणि त्यासोबतच देश चालवतानाही स्वतंत्र बाणा दाखवून दिला.

यामुळे इंदिरा गांधी आणि पक्षातल्या जुन्या नेत्यांबरोबर वारंवार खटके उडत होते. त्यांनी अचानक राष्ट्रपती पदाचे अपक्ष उमेदवार वराहगिरी वेंकट गिरी यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. तर अर्थमंत्री मोरारजी देसाई यांना विश्वासात न घेता बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णयही घेतला. इतरही काही निर्णय पक्षातल्या जेष्ठ नेते आणि पदाधिकारी यांना दुखावणारे होते म्हणून तेव्हाचे काँग्रेस ओ चे पक्षप्रमुख निजलिंगप्पा यांनी इंदिरांवर कारवाई करत त्यांना पक्षातून काढून टाकलं.

दुसरे इंदिरा गांधी सरकार नोव्हेंबर १९६९ मध्ये स्थापन झाले आणि मार्च १९७१ मध्ये विसर्जित झाले, हे स्वतंत्र भारतातील पहिले अल्पसंख्याक सरकार होते. विभाजनानंतर काँग्रेस ( आर) ने ५२३ जागांच्या संसदेत २२१ जागा घेतल्या, बहुमतापेक्षा ४१ जागा कमी असल्याने द्रविड मुन्नेत्र कळघम (डी एम के)(२६ जागा), भारतीय कम्युनिस्ट पार्टी आणि सीपीआय (मार्क्सवादी) यासारख्या डाव्या विचारसरणीच्या पक्षांच्या बाहेरील समर्थनावर अवलंबून राहून इंदिरा गांधी आणि त्यांचे मंत्रिमंडळ सत्तेत राहिले.२७ डिसेंबर १९७० रोजी तिचे अल्पमतातील सरकार पडेल हे जाणून अध्यक्ष व्ही.व्ही.गिरी यांनी गांधींच्या शिफारशीनुसार लोकसभा विसर्जित केली.



**इंदिरा गांधी यांची जादू चालली**

काँग्रेस फुटीनंतर इंदिरा गांधी यांनी स्थापन केलेला काँग्रेस (आर) गटाचे वर्चस्व पूर्ण देशभरात पहावयास मिळाले.चौथ्या लोकसभेत जिथे राष्ट्रीय काँग्रेसला देशात २८३ जागेवर विजय मिळवता आला तिथे काँग्रेस फुटीनंतर इंदिरा गांधी यांच्या काँग्रेस (आर) पक्षाला देशभरातील जनतेने कौल देत ३५२ जागेवर उमेदवार विजयी केले. चोथ्या लोकसभेच्या तुलनेत पाचव्या लोकसभेत काँग्रेसला ६९ जागेवर अधिक विजय मिळवता आला. देशभरात इंदिरा गांधी यांची किमया महाराष्ट्र राज्यात देखील पहावयास मिळाली. ५ व्या लोकसभेत महाराष्ट्र राज्यात ४४ जागेवर काँग्रेस ने आपले उमेदवार उभे केले त्यापैकी तब्बल ४२ उमेदवार विजयी झाले.इंदिरा गांधी यांच्या या जादुई काळात बीड लोकसभा देखील काँग्रेस ने पुन्हा एक वेळ डाव्या पक्षाकडून स्वतःकडे खेचून घेण्यात यशस्वी झाली.

**काँग्रेसचे सयाजीराव पंडित बनले खासदार**

सयाजीराव पंडित म्हणजे दैठणच्या पंडित कुटुंबातील पाहिलं राजकीय व्यक्तिमत्त्व, सन १९६२ ते ६७ या काळात त्यांनी गेवराई विधानसभा मतदार संघाचे नेतृत्व केले. जिल्हा परिषद अध्यक्ष, आमदार, खासदार, यासह विविध राजकीय पदांवर त्यांनी कार्य केले.सयाजीराव पंडित यांनी आपल्या कार्यकाळात कधीच सर्वसामान्य जनतेची नाळ तुटू दिली नाही, बीड मध्ये वास्तव्यास असतांना सुद्धा त्यांना गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या वेदना कळत होत्या. राजकीय पार्श्वभूमी असलेल्या सयाजीराव पंडित यांना १९७२ मध्ये काँग्रेस (आर) पक्षाकडून लोकसभेची उमेदवारी देण्यात आली आणि इंदिरा गांधी यांच्या या सहानुभूतीच्या काळात सयाजीराव पंडित हे जिल्ह्याचे पाचवे खासदार म्हणून दिल्ली दरबारी दाखल झाले.

**निवडणूक निकाल इतिहास**

लोकसभेची पाचवी निवडणूक देखील बीड जिल्ह्यात राष्ट्रीय काँग्रेस विरुद्ध कम्युनिस्ट अशीच लढत पहायला मिळाली.इंदिरा गांधी यांच्या कॉंगेस (आर) कडून गेवराई चे सयाजीराव पंडित तर कम्युनिस्ट पक्षाकडून गंगाधरअप्पा बुरांडे यांच्यात लढत पहायला मिळाली. या लोकसभेकरिता एकूण ५ लाख ७० हजार ९०५ मतदार नोंदणी झालेली होती.त्यापैकी २ लाख ७९ हजार ८१८ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार सयाजीराव पंडित यांना १ लाख ८७ हजार १३२ मत मिळाली तर कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार गंगाधरअप्पा बुरांडे यांना ३२ हजार ५५१ मते मिळावी. सयाजीराव पंडित यांनी गंगाधर अप्पा बुरांडे यांचा तब्बल १ लाख ५४ हजार ५८१ मतांनी पराभव करत बीड चे पाचवे खासदार होण्याचा बहुमान पटकावला.

● अनुप कुसुमकर (भावसार)

# अटक आणि रिमांड दोन्ही बेकायदेशीर, तात्काळ सुटका करा

## केजरीवाल यांची हायकोर्टात धाव

नवी दिल्ली । वृतसंस्था

**कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने गुरुवारी अटक केली. त्यांच्या अटकेनंतर राऊस एव्हेन्यू कोर्टाने केजरीवाल यांना दिलासा देण्यास नकार दिला असून त्यांना २८ मार्चपर्यंत ईडी कोठडीत पाठवले आहे. यातच आता केजरीवाल यांनी ईडीच्या अटकेला आणि रिमांडला हायकोर्टात आव्हान दिले आहे.**

केजरीवाल यांनी हायकोर्टात दाखल केलेल्या याचिकेत ईडीचा अटक आणि कोठडीचा आदेश दोन्ही बेकायदेशीर असल्याचा युक्तिवाद केला आहे. यामुळे ईडीच्या कोठडीतून तात्काळ सुटका करण्यात यावी, असं त्यांनी याचिकेत म्हटलं आहे. केजरीवाल यांनी हायकोर्टाच्या मुख्य न्यायमूर्तींकडे रविवार २४ मार्चपर्यंत तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली आहे. दरम्यान, ईडीने कोर्टात दावा केला की, केजरीवाल यांनी आम आदमी पक्षाद्वारे पैसे लाँडर करण्यासाठी दिल्लीचे मुख्यमंत्री असल्याचा गैरफायदा घेतला. ते मद्य धोरण घोटाळ्यातील मोठे लाभार्थी आहेत. केजरीवाल यांच्या कोठडीची मागणी करत ईडीने कोर्टात सांगितले की, अरविंद केजरीवाल हे मद्य धोरण घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार आहेत. ईडीने केजरीवाल यांची १० दिवसांची कोठडी मागितली होती. यावेळी त्यांनी केजरीवाल यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील अभिषेक सिंघवी यांनी दावा केला की, मद्य धोरण प्रकरणात २०० हून अधिक छापे टाकूनही, आप नेत्याचा गुन्ह्यात सहभाग दर्शविणारा कोणताही पुरावा नाही. कोणतेही आक्षेपार्ह साहित्य सापडले नाही. ते म्हणाले की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मद्य धोरणात काही चुकीचे केले किंवा कोणताही फायदा मिळवला हे सिद्ध करण्यासाठी कोणताही पुरावा किंवा सामग्री नाही. ईडीने प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग कायद्यांतर्गत (पीएमएलए) राजकीय सूड उगवण्यासाठी आपल्या अधिकारांचा गैरवापर केल्याचा आरोप त्यांनी केला. असं असलं तरी कोर्टाने केजरीवाल यांना ७ दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे. यालाच आता केजरीवाल यांनी हायकोर्टात आव्हान दिले आहे.

# गरजवंत मराठे आणि वंचितांच्या प्रश्नांसाठी अशोक हिंगे पाटील यांनी लोकसभा लढवावी - बाबुराव मस्के

बीड । प्रतिनिधी

**आगामी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत गरजवंत मराठा समाजाच्या व वंचित उपेक्षित वर्गाच्या प्रश्न संसदेत मांडण्या साठी अशोक भाऊ हिंगे यांनी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निवडणूक लढवावी अशी मागणी वंचित बहुजन युवा आघाडीचे पुर्व जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के यांनी केली आहे.**



अशोक भाऊ हिंगे पाटील हे गेल्या तीस वर्षांपासून मराठा आरक्षण लढ्यात सक्रिय असुन समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी ते अनेक वेळा रस्त्यावर उतरले आहेत.समाजातील अनिष्ट रुढी प्रथा परंपरा दुर करण्यासाठी सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करून समाज प्रबोधनाचे काम केले आहे. गेल्या पाच वर्षांपासून ते श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण मराठवाड्यात त्यांनी वंचित च काम उभा करून वंचित उपेक्षित मुस्लीम ओबीसी समाजाच्या प्रश्नांसाठी वंचित च्या माध्यमातून ते रस्त्यावर उतरले आहेत. बीडच्या रेल्वे प्रश्न, मराठवाड्याला २१ टीमसी पाण्याचा प्रश्न, दुष्काळी मराठवाड्यात पश्चिम महाराष्ट्रातुन पाणी सोडण्याचा प्रश्न, यावरील आंदोलनात अशोक भाऊंचा सक्रिय सहभाग राहीलेला आहे.यंदा मराठवाड्यात संपूर्ण दुष्काळ जाहीर करा या मागणीसाठी सर्व प्रथम वीस पंचवीस हजारांचा मोर्चा आयुक्त कार्यालयावर काढला होता. जिल्ह्यातील मराठा आरक्षण मुस्लिम आरक्षण , ओबीसी चे राजकीय आरक्षण मुस्लीम समाजाचे शाहीन बाग आंदोलन, यासारखे सामाजिक, राजकीय विकास प्रश्नावरील आंदोलन अशोक भाऊंच्या सक्रिय सहभागा शिवाय पार पडत नाहीत हे जिल्ह्याने बघीतलेले आहे. शिव शाहु फुले आंबेडकर विचारसणीवर आयुष्यभर चालणारा हा सर्व सामान्य मराठा समाजाचा युवा नेता प्रस्थापित नेत्यांनी कायम वंचित ठेवलेला आहे. म्हणुन श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी बीड लोकसभेसाठी अशोक हिंगे यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी आम्ही कार्यकर्ते करणार असुन उमेदवारी मिळाल्यास हिंगे यांच्या पाठीशी गरजवंत आणि उपेक्षित मराठा समाज दलित अल्प संख्याक ओबीसी समाज त्यांच्या पाठीशी राहील असा विश्वास आंबेडकर साहेबांना आम्ही देणार आहोत अशी माहिती बाबुराव मस्के यांनी दिली आहे.

# केरळ सरकारची राष्ट्रपती मुर्मु यांच्यासह राज्यपालांच्या विरोधात न्यायालयात याचिका

## कोणतेही कारण न देता विधेयके रोखून धरल्याचा ठपका

नवी दिल्ली। वृतसंस्था

**केरळ विधानसभेने मंजूर केलेल्या चार विधेयकांना कोणतीही कारणे न देता संमती रोखल्याबद्दल आणि केरळचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांच्यावर ही विधेयके दिर्घकाळ आणि अनिश्चित काळासाठी प्रलंबित ठेवल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयात केरळ सरकारने २३ मार्च रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि राज्यपाल यांच्यावर याचिका दाखल केली.**

कोणतेही कारण न देता चार विधेयकांना संमती रोखून ठेवण्याची राष्ट्रपतींची कृती अत्यंत मनमानी आणि घटनेच्या कलम १४, २०० आणि २०१ चे उल्लंघन करणारी आहे. घटनात्मक नैतिकतेच्या आधारावर राष्ट्रपतींना सात विधेयकांचा संदर्भ आठवावा लागेल, असा युक्तिवाद केरळ सरकारच्या वकीलांनी याचिकेच्या माध्मातून केला. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेत केरळ राज्य सरकारने राष्ट्रपतींचे सचिव, केरळचे राज्यपाल आणि राज्यपालांचे अतिरिक्त मुख्य सचिव यांना याचिकेत प्रतिवादी म्हणून ठरवले आहे. सर्वोच्च न्यायालयात केरळचे प्रतिनिधीत्व एक वरिष्ठ वकील, घटनात्मक बाबींमधील तज्ञ आणि सी.के. ससी, यांनी दाखल केलेल्या याचिकेत म्हटले की, ११ ते २४ महिन्यांपूर्वी केरळ विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांना संमती रोखण्यासाठी राष्ट्रपतींना सल्ला देण्याच्या केंद्र सरकारच्या कृती, राज्यघटनेच्या संघराज्यीय रचनेला तडा देणाऱ्या आहेत. राज्यघटनेनुसार राज्याला सोपवलेल्या अधिकारातही हे गंभीर अतिक्रमण होत असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; गुन्हा दाखल

परळी । प्रतिनिधी

**शहरातील भीमनगर भागात महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात विनयभंग व बाललैगिंक अत्याचार विरोधी कलमानव्यें गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील भीमनगर भागात वास्तव्यास असलेली अल्पवयीन मुलगी,बहीण व आई हे तिघे जण शहरात भरलेल्या यात्रेतून घरी परतले असता फिर्यादीची मुलगी फोन का बोलत नाही या कारणावरून आरोपीने शिवीगाळ केली तसेच आई मदतीसाठी धावून आली असता आईस मारहाण करत जबरदस्तीने वाईट हेतूने फिर्यादी मुलीचा हात धरून फोन वर नाही बोललीस तर जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात गुरन ४७/२०२४ कलम ३५४,३२३,५०४,५०६ भादवि सहकलम ८,१२ पोस्को कायदानव्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक शेटे मॅडम करत आहेत.

## पान १ वरून...

पान १ वरून...

### कांदा अनुदान निधी

नोंदीवरून स्पष्ट झाले. त्यामुळे हिवाळी अधिवेशनात पुरवण्या मागणीत ३०१ कोटी ६६ लाख ९३ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यातील ७० टक्के मर्यादेत २११ कोटी ६६ हजार कोटीच्या वितरणाला वित्त विभागाने मान्यता दिली होती. त्यानुसार ८ फेब्रुवारी २०२४ रोजी शासनादेश काढत १० कोटी पेक्षा जास्त अनुदानाची मागणी असलेल्या १० जिल्ह्यातील लाभार्थीचे टप्पे करण्यात आले. त्यानुसार आता अनुदान वाटप करण्यात येणार आहे. वास्तविक लोकसभा निवडणुकांमध्ये शेतकऱ्यांची नाराजी उमटू नये, यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. राज्य सरकारने शासन निर्णयांचा सपाटा लावला आहे. सोयाबीन, कापूस, कांदा उत्पादक शेतकऱ्यांची केंद्र सरकारच्या धोरण लकव्यानं माती केली. त्यात लोकसभेच्या तोंडावर ग्राहकांचं हित जपण्यासाठी शेतकरीविरोधी निर्णयांचा सपाटाच लावला. त्यामुळे या ना त्या प्रकारे शेतकऱ्यांना खुश करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. कांदा निर्यातबंदीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. त्यामुळे आता अनुदानाच्या मलमपट्टीचा शेतकऱ्यांना आधार मिळेल आणि मागचे सगळे विसरून शेतकरी मते देतील असे सरकारला वाटत असावे.

----------

### आंबेडकर यांचा महाआघाडीला

निवडणूकीत काहीही करून भाजपाला केंद्रातील सत्तेत जाण्यापासून रोखण्यासाठी राज्यातील महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि शिवसेना उबाठा गटाकडून वंचित बहुजन आघाडीला समाविष्ट करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, प्रकाश आंबेडकर यांना तुम्हाला किती जागांवर विजय मिळेल असा विश्वास आहे असा सवाल केल्यानंतर प्रकाश आंबेडकर म्हणाले की, सध्या तरी आम्ही महाविकास आघाडीला दिलेल्या प्रस्तावावर काय उत्तर दिले जाते याची वाट पाहत आहोत. जर २६ तारखेपर्यंत महाविकास आघाडीचा प्रतिसाद मिळाला तर त्यांच्यासोबत अन्यथा आम्ही यापूर्वीच जाहिर केल्याप्रमाणे २६ मार्च रोजी आम्ही आमची भूमिका स्पष्ट करू असे ते म्हणाले. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, त्या तिघांमध्येच लोकसभा जागांवरून खेचाखेची सुरू आहे. त्यामुळे त्यात आम्ही आमचा विषय कुठे पुढे नेणार. त्यामुळे त्यांच्यातील चर्चा अंतिम झाल्यानंतर आम्ही आमची भूमिका मांडू असे सांगत आम्ही काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांना दिलेल्या प्रस्तावानुसार त्यांनी त्यांच्या पसंतीच्या ७ जागा आम्हाला सांगाव्यात त्या सात जागांवर आम्ही त्यांना पाठिंबा देऊ, असे आंबेडकर म्हणाले.

---------

### पंकजा मुंडेंच्या विजयासाठी

असलेल्या आ. लक्ष्मण पवार यांच्या निवासस्थानी भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी शनिवारी दुपारी १२ वा. भेट दिली. यावेळी त्यांच्या सोबत खा. प्रितम मुंडे या होत्या. याप्रसंगी मुंडे व पवार यांच्यात बराच वेळ लोकसभा निवडणुकीबाबत चर्चा झाली. पंकजा मुंडे या फडणवीस सरकारमध्ये मंत्री असताना आ. पवार यांच्याशी त्यांचे नाराजीनाट्य सुरु झाले होते. त्यानंतर ते मुंडे यांच्या बऱ्याच कार्यक्रमाला गैरहजर होते. त्यामुळे आ. पवार हे लोकसभेला पंकजा मुंडे यांचे काम करतील की नाही? या विषयी चर्चा रंगू लागल्या होत्या. मात्र मुंडे यांच्या भेटीने नाराजीनाट्यावर पडदा पडला असल्याचे म्हटले जात आहे.

यावेळी शिवराज पवार, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, सर्जेराव तादंळे, देविदास नागरगोजे, सलीम जहागिर, शाम कुंड, दादासाहेब गिरी, प्रकाश सुरवसे, राजेंद्र राक्षसभुवनकर, बंडू बारगजे, ब्रम्हदेव धुरंधरे, मधुकर वादे, बाळासाहेब सानप, भरत गायकवाड, राजाभाऊ आर्दड, याहीया खॉन, मुन्नाभाई, काशीनाथ पवार आदीसह भाजपाचे पदाधिकारी व पत्रकार बांधव उपस्थित होते.

---------------

### मास्को दहशतवादी हल्ल्यात

दहशतवादी हल्ल्यात एका मुलासह १६ जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. रशिया सरकारची वृत्तसंस्था आरआयए नोवोस्टीने दिलेल्या वृत्तानुसार, सशस्त्र बंदूकधाऱ्यांनी स्वयंचलित शस्त्रांनी गोळीबार केला. तसेच त्यांनी ग्रेनेड आणि स्फोटके फेकली. ज्यामुळे आग लागली. या प्रकरणी आतापर्यंत ११ संशयितांना अटक करण्यात आली आहे.

----------

### शेतकऱ्यांसाठी चुकीचे निर्णय

भ्रष्टाचार वाढले आहेत हे घालवायचे असेल तर चुकीचे निर्णय घेणाऱ्यांना सत्तेपासून बाजूला करणे, हे तुमचे आणि माझे कर्तव्य आहे. २०२४ वर्ष सुरू आहे तरीही शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले नाही. सरकारने कांदा निर्यातबंदी केली, त्यामुळे कांद्याचे भाव पडले. कांदा उत्पादक शेतकरी रस्त्यावर आला. कापूस उत्पादक हवालदिल झाला. पण सरकारला त्याची काहीच काळजी नाही. पंतप्रधानांवर टीका केली, म्हणून दिल्लीचे लोकप्रिय मुख्यमंत्री आज तुरुंगात आहेत. आज काँग्रेस पक्षाचे खाते गोठवले, उद्या तुम्ही विरोधात भूमिका घेतली, तर तुमचेही खाते बंद करतील. आघाडीचे उमेदवार निवडून आणणे हे तुमचे आणि माझे कर्तव्य आहे असे ते म्हणाले.

-----------

### निवडणूक रोखे घोटाळ्याची एसआयटीद्वारे

रोख्यांद्वारे भाजपला देण्यात आली. हप्ता वसुली प्रकारामध्ये ४१ कंपन्यांवर ५६ वेळा ईडी, सीबीआय, प्राप्तिकरखात्याचे छापे पडले. या सर्वांनी २५९२ कोटी रुपयांची देणगी भाजपला दिली. त्यातील १८५३ कोटी रुपयांची देणगी छाप्यांनंतर देण्यात आली आहे. बनावट कंपन्यांद्वारे दिलेल्या ५४३ कोटी रुपयाच्या देणग्यांमध्ये १६ बनावट कंपन्यांनी भाजपला ४१९ कोटी रुपयांची देणगी दिली आहे. या संपूर्ण प्रकाराची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली एसआयटी नेमून चौकशी केली जावी, अशी मागणी काँग्रेस सरचिटणीस जयराम रमेश यांनी केली. इंडिया आघाडीची सत्ता आल्यास निवडणूक रोखे योजनेची एसआयटीद्वारे चौकशी केली जाईल. यासोबतच, पीएमकेअर्स योजना आणि मोदी अदानी संबंधांची संयुक्त संसदीय समिती नेमून चौकशी केली जाईल, असाही दावा जयराम रमेश यांनी केला.

-----------

### मविआचे ठरले; बजरंग सोनवणे

वंचित बहुजन आघाडीचा उमेदवार नसता तर त्या निवडणुकीत वेगळा निकाल लागला असता. त्यामुळे बजरंग सोनवणे हे यावेळी सुध्दा प्रभावी अस्त्र ठरु शकतात. शिवाय त्यांच्याकडे येडेश्वरी साखर कारखाना असून अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमधील असंख्य नेते आणि पदाधिकाऱ्यांशी जिव्हाळ्याचे असलेले संबंधीही या निवडणुकीत कामी येणार असल्याचे म्हटले जात आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवरच बजरंग सोनवणे यांनी सुरुवात केली असल्याचे समजते. रविवारी सोनवणे यांचा नांदुरघाट सर्कलमधून दौरा सुरु होणार असून ते दररोज मतदारांच्या गाठीभेटी घेणार असल्याचे म्हटले जात आहे. त्यांच्या नावाची दोन ते तीन दिवसात अधिकृत घोषणा होणार आहे.

**गत निवडणुकीचा अनुभव कामी येणार**

बजरंग सोनवणे यांनी २०१९ मध्ये प्रितमताई मुंडे यांच्या विरोधात बीड लोकसभा लढवली होती. या निवडणुकीत सोनवणे यांनी चांगलीच टक्कर दिली होती. त्यावेळचा अनुभव या निवडणुकीत त्यांच्या कामी येऊ शकतो.

**जरांगे फॅक्टरचा आधार**

मराठा आरक्षण आंदोलनामुळे संपुर्ण राज्यात सामाजिक वातावरण ढवळून निघाले आहे. त्याचा परिणाम बीड मतदार संघातही दिसत आहे. गावागावात आता त्याची चुणूक दिसत आहे. त्यामुळे बजरंग सोनवणे मविआचे उमेदवार राहिले तर त्यांना जरांगे फॅक्टरचा आधार राहू शकतो, असे दिसते.

**उमेदवारीवरुन साठे, डॉ. काळे नाराज**

महाविकास आघाडीकडून ज्योतीताई मेटे आणि बजरंग सोनवणे यापैकी एकाची उमेदवारी निश्चित केली जाण्याची दाट शक्यता आहे. विशेषत: हे दोघेही शरद पवारांच्या पक्षातील नसल्याने त्यांच्या उमेदवारीला माजी आ. पृथ्वीराज साठे आणि उमेदवारीचे दावेदार डॉ. नरेंद्र काळे यांनी शनिवारी आंबाजोगाईत कार्यकर्त्यांची बैठक घेऊन तीव्र नाराजी दाखवली आहे. बाहेरुन आलेल्यांपेक्षा पक्षातील निष्ठावंतांनाच उमेदवारी देण्याची मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे शरद पवार यांच्या बीड जिल्ह्यातील पक्षात सर्व काही अलबेल आहे असे नाही.

----------



बीड : जिल्हाधिकारी कार्यालयात शहीद दिनानिमित्त भगत सिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माहिती अधिकारी अंजु कांबळे निमसरकर यांच्यासह हर्षद कांबळे, बंडू गुलाब गायकवाड, राजश्री आचार्य, गोतराम गोरोल, राम घडते उपस्थित होते.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. २४ मार्च २०२४



# राज्यात सहा दिवसात १.८४ लाख नवीन मतदारांची नोंदणी

## नवमतदारांचा नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद -एस. चोक्कलिंगम्

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सन २०२४ चा कार्यक्रम जाहिर केला आहे. राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघासाठी एकूण पाच टप्प्यांमध्ये मतदान घेण्यात येणार आहे. दिनांक १७ ते २२ मार्च २०२४ या कालावधीत राज्यात १ लाख ८४ हजार ८४१ इतक्या नवीन मतदारांची नोंदणी झाली आहे, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम्? यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ येथे लोकसभा निवडणूक २०२४ बाबत माहिती देण्यासंदर्भात आयोजि पत्रकार परिषदेत श्री एस. चोक्कलिंगम्? बोलत होते. यावेळी सह सचिव व अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक(माहिती) डॉ.राहूल तिडके, अवर सचिव तथा उप निवडणूक अधिकारी शरद दळवी उपस्थित होते.पहिल्या टप्प्यात विदर्भातील ५ लोकसभा मतदारसंघामध्ये दिनांक १९.०४.२०२४ रोजी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठीचे नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची प्रक्रिया दिनांक २०.०३.२०२४ पासून सुरु झाली आहे, नामनिर्देशनपत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक २७.०३.२०२४ असा आहे, नामनिर्देशनपत्राची छाननी दि.२८.०३.२०२४ रोजी आहे, उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दि.३०.०३.२०२४ असा आहे. त्या दिवशी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी निश्चित होईल.

आजपर्यंत रामटेक-१, नागपूर-५,भंडारा-गोंदिया-२,गडचिरोली-चिमुर-२ व चंद्रपूर - ० इतके नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाले आहेत.



पहिल्या टप्प्यातील ५ लोकसभा मतदारसंघातील मतदाराबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे

९- रामटेक मतदारसंघात पुरुष मतदार १० लाख ४४ हजार ३९३, महिला मतदार १० लाख ३ हजार ६८१, तृतीयपंथी मतदार ५२, एकुण २० लाख ४८ हजार १२६, मतदान केंद्रे २ हजार ४०५ आहेत.

१० नागपुर मतदारसंघात पुरुष मतदार ११ लाख १२ हजार ७३९, महिला मतदार ११ लाख ९ हजार ४७३, तृतीयपंथी मतदार २२२, एकुण २२ लाख २२ हजार ४३४, मतदान केंद्रे २ हजार १०५ आहेत.

११- भंडारा-गोंदिया मतदारसंघात पुरुष मतदार ९ लाख ०९ हजार १७०, महिला मतदार ९ लाख १७ हजार १२४, तृतीयपंथी मतदार १४, एकुण १८ लाख २६ हजार ३०८, मतदान केंद्रे २ हजार १३३ आहेत.१२-गडचिरोली चिमुर मतदारसंघात पुरुष मतदार ८ लाख १४ हजार ४९८, महिला मतदार ८ लाख ०२ हजार ११०, तृतीयपंथी मतदार १०, एकुण १६ लाख १६ हजार ६१८, मतदान केंद्रे १ हजार ८९१ आहेत.

१३-चंद्रपुर मतदारसंघात पुरुष मतदार ९ लाख ४५ हजार ४६८, महिला मतदार ८ लाख ९१ हजार ८४१, तृतीयपंथी मतदार ४८, एकुण १८ लाख ३७ हजार ३५७, मतदान केंद्रे २ हजार ११८ आहेत.

निरीक्षकांची नियुक्ती

भारत निवडणूक आयोगाकडून देशातील सार्वत्रिक निवडणूकांदरम्यान भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलिस सेवा, एससीएस, भारतीय वनसेवा, राजपत्रित अधिकारी हे जनरल निरीक्षक, खर्च निरीक्षक,पोलीस निरीक्षक म्हणुन नियुक्त केले जातात. सन २०२४ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकांसाठी महाराष्ट्रातील निरीक्षक अधिका-यांचे प्रशिक्षण भारत निवडणूक आयोगाकडून दि.११.०३.२०२४ रोजी नवी दिल्ली येथे व आभासी प्रशिक्षण मुंबई व पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. भारत निवडणूक आयोगाकडून या निरीक्षक अधिका-यांची निवडणूक टप्प्यांनुसार लोकसभा मतदार संघामध्ये नियुक्ती करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील पहिल्या टप्प्यातील लोकसभा मतदार संघासाठी भारत निवडणूक आयोगाने जनरल निरीक्षक, खर्च निरीक्षक, पोलीस निरीक्षक यांची नियुक्ती केली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील ५ मतदारसंघात ५ जनरल निरीक्षक, ६ खर्च निरीक्षक व ३ पोलीस निरीक्षक यांची नियुक्ती केली आहे.

कायदा व सुव्यवस्था; १३,१४१ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

# जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत परळीत विविध विषयांवर बैठक

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या उपस्थीतीत पाणी,चारा टंचाई , मनरेगा तसेच ३९ बीड लोकसभा निवडणूकच्या अनुषंगाने २३३-परळी विधानसभा मतदार संघाची आढावा बैठक परळी तहसील कार्यालयात आज झाली.




या बैठकीस तालुक्यातील सर्व विभागांचे कार्यालयीन प्रमुख उपस्थित होते. यावेळी परळी तालुक्यातील पाणी, चारा टंचाई तसेच निवडणूक ही संदर्भात केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला आणि नागरिकांना पाण्याची कमतरता होणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश दिले. जिल्ह्यात चारा वाहतूक बंदी असून पशुधनाला चाराने कमी पडणार नाही याची काळजी घ्यावी असे सांगितले.

निवडणुकीच्या काळात महात्मा गांधी रोजगार हमी योजना अंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण केली जाऊ शकतात त्यामुळे या अंतर्गत असणारी कामे सुरू ठेवण्याबाबत निर्देशित केले. बीड जिल्ह्यातील परळी मतदारसंघ संवेदनशील असून या मतदारसंघात आचारसंहितेचे सर्व नियमांचे पालन व्हावे तसेच कुणीही आदर्श आचारसंहितेच भंग होणार नाही याची काळजी घ्यावी अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या. विविध निवडणूक कक्षाला यावेळी जिल्हाधिकारी यांनी भेट दिली.

# छत्रपती शिवाजी विद्यालयात राष्ट्रीय हरित सेना कार्यशाळेचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात सामाजिक वनीकरण परिक्षेत्राच्या वतीने शनिवारी दि.२३ मार्च रोजी राष्ट्रीय हरित सेना कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मनोज सोळंके होते. यावेळी वनरक्षक बी.बी.शेळके,वन मजूर विष्णू भिसे, गोविंद क्षिरसागर यांची उपस्थिती होती.




यावेळी बोलताना वनरक्षक बी.बी.शेळके म्हणाले की,वृक्ष हे आपले मित्र आहेत. विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवड व वृक्षांचे संगोपन केले पाहिजे. पावसाळ्यात ज्या ठिकाणी मोकळी जागा असेल त्या ठिकाणी वृक्षारोपण केले पाहिजे. झाडांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत.अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक मनोज सोळंके म्हणाले की, तुकाराम महाराजांनी म्हटले आहे वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे,वृक्ष आपल्याला प्राणवायू देतात. यामुळे मुलांनी आपल्या वाढदिवसाला वृक्षारोपण करून आपला वाढदिवस साजरा करावा, व त्या झाडांचे संगोपन करावे.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालासाहेब झोडगे यांनी केले.याप्रसंगी छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी इयत्ता नववी वर्गातील राष्ट्रीय हरित सेनेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# पोलीस भरती विद्यार्थ्यांसाठी दोन वर्ष वय व पंधरा दिवसाचा वेळ वाढवून देण्यात यावा-नितीन सोनवणे

पाटोदा । प्रतीनीधी

लॉकडाऊन मध्ये कसल्याही प्रकारची शासनाची भरती न निघाल्यामुळे मुलांचे दोन वर्षे वाया गेले आहेत तरी दोन वर्षे वयोमर्यादा वाढवून देण्यात यावी व पंधरा दिवस अर्ज भरण्यासाठी वेळ वाढवून दिला पाहिजे



२०२० ते २०२१ या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये कसल्याही प्रकारची शासकीय नोकर भरती करण्यात आली नव्हती प्रलंबित असतानाही परीक्षा घेण्यात आल्या नव्हत्या तरी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत शासनास व ग्रह विभागास विनंती करत आहोत की सार्वत्रिक साथ रोगामुळे एक जानेवारी २०२० ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीमध्ये ज्या उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे असे सर्व प्रवागांचे उमेदवार निवडीद्वारे मुक्त पदांसाठी सन २०२० व २०२१ या कालावधीमध्ये वर्षातील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात या वयाच्या भरती प्रक्रियेसाठी एक वेळेची उपयोजना म्हणून पात्र असतील असा जीआर शासनाने काढला होता त्याच संदर्भात या सर्व बाबींचा विचार करून दोन वर्षाची वयोमर्यादा वाढवून देण्यात यावी व ३१ मार्च ही तारीख अर्ज भरण्याची शेवटची आहे ऑनलाइन साईट व्यवस्थित चालत नसल्यामुळे अनेक विद्यार्थी फॉर्म भरायचे राहिले आहेत, म्हणून पंधरा दिवसांचा वेळ अर्ज भरण्यासाठी वाढवून देण्यात यावा नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष, आकाश देवकते, ज्ञानेश्वर शिंदे ऑल इंडिया पँथर सेनेनी मागणी केली आहे.

# केंद्र शासनाकडून 'सिमी' बेकायदेशीर संघटना घोषित

## बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंधक) न्यायाधिकरणाकडून 'सिमी'ला नोटीस

बीड । प्रतिनिधी

केंद्र शासनाने २९ जानेवारी २०२४ काढलेल्या एस.ओ. ३५४ (इ) या अधिसूचनेनुसार स्टुडंट्स इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) या संघटनेला बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित केले आहे. बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम १९६७ कायद्याच्या कलम ३ च्या उप कलम (१) द्वारे ही कारवाई करण्यात आली आहे. याबाबत बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंधक) न्यायाधिकरण समोर सुनावणी सुरु असून २९ फेब्रुवारी २०२४ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये

'सिमी' संघटनेला बेकायदेशीर संघटना का घोषित केले जावू नये, याबाबत सिमी संघटनेला कारणे दाखवा नोटीस बजाविण्याचे आदेश न्यायाधिकरणाने दिले आहेत. 'सिमी' संघटनेच्या कार्यालयाला अधिसूचनेची प्रत लावणे, शक्य असेल तिथे पदाधिकाऱ्यांना नोटीस देणे, नोंदणीकृत पोस्ट अथवा स्पीड पोस्ट अथवा कुरियरद्वारे देखील नोटीस पाठविणे, संघटनेचे कार्यक्षेत्र असलेल्या भागात लाऊडस्पीकरद्वारे घोषणा करणे, रेडिओ, दूरदर्शनवर घोषणा करणे, प्रसारमाध्यमातून नोटीस प्रसिद्ध करण्याची कार्यवाही करण्याचे न्यायाधिकरणाने आदेशित केले आहे. या अनुषंगाने न्यायाधिकरणाची पुढील सुनावणी ९ एप्रिल २०२४ रोजी कोर्ट रूम नं. १६, दिल्ली हायकोर्ट, शेर खान रोड, नवी दिल्ली येथे होणार आहे.

पान ६ वरून...

### देवाच्या नाही तर शेतकऱ्याच्या नावाचा

आणि ज्ञानेश्वर दादा रक्षक यांनी ग्रामगीतेतील पर्यावरण रक्षण, अंधश्रद्धा निर्मुलन, मुलींचे शिक्षण यावर उत्तम प्रबोधन केले.

महिलांचा सन्मान ही संतांची शिकवण- विजय महाराज गवळी

जगद्गुरु तुकाराम महाराज यांना बदनाम करण्यासाठी देशात व्यवसाय करणा-या स्त्रीला त्यांच्याकडे पाठविले जाते. पण महाराज किंचितही विचलित होत नाहीत, उलट तिला -

जाई ओ तू माय न करी सायास
आम्ही विष्णूदास तैसे नहो

असे बोलून तिला परत पाठवतात. हीच शिकवण शिवाजी महाराज यांना तुकाराम महाराज यांच्याकडून मिळाली. म्हणून नजराना म्हणून आणलेल्या कल्याणच्या शुभेदा-याच्या सेनेची शिवाजी महाराज यांनी बोळवण करून परत पाठवली केली. यातून इंद्रिय निग्रह आणि स्त्रियांच्या सन्मानाची संतांची भूमिका स्पष्ट होते, असे रात्रीच्या कीर्तनात विजय महाराज गवळी म्हणाले.

### सर्वसामान्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची

माता-पालक व मान्यवर अक्षरशः भारावून गेले होते.

माजलगाव तालुक्यातील शिक्षणाचे माहेरघर म्हणून पुढे येत असलेल्या दिंद्रुड परिसरातील यश इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच साजरे झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कै. रामभाऊ (अण्णा) खाडे सेवाभावी संस्था, लातूर चे अध्यक्ष प्रदीप खाडे तर उद्घाटक दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सपोनि अण्णाराव खोडेवाड हे होते. उद्योजक सुरेश फड, मनोज गित्ते, प्रा. प्रदीप रोडे, शिवाजी चाटे, जनक उबाळे, राजाभाऊ चाटे, बालासाहेब राठोड, अजय चाटे, सचिन सानप, एस पी जळकोटे, नाथ शिक्षण संस्थेचे संचालक आणि जालना, लातूर, परभणी येथील विविध क्षेत्रातील मान्यवरांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

येथील यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनियर कॉलेज च्या वार्षिक स्नेहसंमेलन मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना सपोनि खोडेवाड यांनी शेतकरी पोवाडा गायला. या स्नेहसंमेलनाची सुरुवात ''भारत का संविधान हैं'' या गाण्याने करण्यात आली. त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांनी माता-पालकांबरोबर रसिकांचे मन जिंकले. यामध्ये लोकसंगीत, लावणी, वासुदेव, गोंधळी, कोळी गीत याचबरोबर हिंदी, मराठी चित्रपटातील गाण्यावर नृत्य सादर करण्यात आले. प्रबोधनात्मक लघु नाट्येही सादर करण्यात आली. दिंद्रुड सह पंचक्रोशीतील दोन हजारांपेक्षा जास्त महिला-पुरुषांची येथील कार्यक्रमाला उपस्थिती होती.गोरगरिबांची लेकरं शिकत असलेल्या या सिबीएसई शाळेमुळं आणि नाथ शिक्षण संस्थेमुळे ग्रामीण भागातून गोरगरिबांपर्यंत शिक्षणाची गंगा वाहिली म्हणून देशातले सर्वात मोठे दैनिक असलेला 'दैनिक भास्कर' चा 'चर्चेतील चेहरा' हा सर्वोच्च पुरस्कार केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड, रावसाहेब दानवे यांच्या हस्ते दिव्य मराठीच्या माध्यमातून आठ दिवसांपूर्वी चर्चेतील चेहऱ्यांमध्ये मला सन्मानित करण्यात आले असून, याचा मला सार्थ अभिमान आहे. असे संस्थाध्यक्ष प्रदीप खाडे यांनी बोलताना सांगितले. यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देत खाडे यांना गहिवरून आले.

### अतरवली सराटी येथील महाबैठकीस

धारूर तालुक्यातील हजारो मराठा बांधव जाणार आहेत.या बैठकीस उपस्तिथ राहून जरागे पाटील यांच्या पाठीशी खंबीर उभे राहण्याच्या निर्धार मराठा युवकांनी केला आहे. या बैठकीस धारूर तालुक्यातील मराठा समजतील युवकांनी हजारोच्या संख्येने हजर राहण्याचे आव्हान संकल मराठा समाजाच्या वतीने करण्यत आले आहे.

पान ६ वरून...

### निरंजनची सायकल गरीब

वतीने एक खास कार्यक्रम घेऊन तालुक्यातील दत्तक घेतलेल्या अनाथ, गोरगरीब, आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या सुमारे शंभर विद्यार्थ्यांना आज मान्यवरांच्या हस्ते सायकलची वाटप करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून महाराज बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जर्मनीच्या पिल्झ इंडिया कंपनींचे सर्व्हिस हेड महेशजीं जोशी, सेल्स हेड हेमंत कौलगेकर, टेक्निकल हेड रित्विक शर्मा,निरंजन सेवाभावी संस्थेचे अहिल्यानगरचे अतुल डागा, रुपाली संदेश मालानी, झील मालणी, भीमाबाई कासट, जयेश कासट, गट शिक्षणाधिकारी जमीर शेख, उप नगराध्यक्ष प्रकाश देसरडा, डॉ. रामनालाल बडजाते मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती होती. पुढे बोलताना शिरूर कासार तालुका अगदी दुष्काळ आणि पछाडलेला तालुका आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी तालुक्यातील गावा गावातून बहुतांश लोक ऊस तोडणी स्थानसाठी स्थलांतर करत आहे. पाठीमागे राहतात ती वृद्ध आणि छोटी छोटी शाळकरी मुले या मुलांची आणि वृद्धांची आर्थिक परिस्थिती अवहेलना होते. शिक्षणाबाबतीत तर मोठी बिकट परिस्थिती असते. या परिस्थितीची सामाजिक जाण ठेवून पुणे येथील निरंजन सेवाभावी संस्था गेल्या बारा वर्षापासून गोरगरीब विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांचे पालकत्व स्वीकारते आणि त्यांना मदतीचा ही बाब निश्चितच डोळ्यात अंजन घालणारी आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये भरारी घेण्यासाठी हातभार म्हणून यावेळी निरंजन सेवाभावी संस्थेने सुमारे १०० विद्यार्थ्यांना यावेळी सायकलची वाटप केली आहे. यामुळे निश्चितच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मोठा हातभार लागणार आहे. निरंजनची ही सायकल विद्यार्थ्यांना यशस्वी जीवनाची प्रवास करण्यासाठी सोयीस्कर होणार असल्याचा विश्वास महाराजांनी व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी पवार यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी पत्रकार गोकुळ पवार, व सतीश मुरकुटे यांनी खास मेहनत घेतली होती.

ज्ञानेश्वरीच्या वाढदिवसाला मिळाली सायकल

निरंजन सेवाभावी संस्थेच्या वतीने शनिवार दि.२३ मार्च रोजी तालुक्यातील १०० विद्यार्थ्यांना सायकलची वाटप केली. यामध्ये कु. ज्ञानेश्वरी दत्ता भालेकर या विद्यार्थिनीला ऐन वाढदिवसाच्या दिवशी निरंजन संस्थेच्या वतीने सायकलची भेट मिळालेले ज्ञानेश्वरीच्या चेहऱ्यावर दिवसभर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला.

दिनांक: २३-०३-२०२४

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस, वित्त संस्थांना, पतसंस्थांना, बँकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सविता राधेशाम सौंदर, रा. पुंगणी, ता. माजलगाव, जि. बीड हे आहेत.

सदर मिळकत ही पुर्वीचे मालक आसाराम पंडितराव शिंदे वगैरे यांनी उज्वला अनिलकुमार मुनोत यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१०५/२००७ दिनांक १०-०७-२००७ अन्वये विक्री केलेली आहे. त्यानंतर सदर मिळकत उज्वला अनिलकुमार मुनीत यांनी मोतीलाल रायचंद संचेती यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. १५७१/२००९ दिनांक १३-०५-२००९ नुसार विक्री केलेली आहे. त्यानंतर सदर मिळकत मोतीलाल रायचंद संचेती यांनी उद्धव ज्ञानोबा अहिरे यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. ५९५३/२०१४ दिनांक २७-१०-२०२४ नुसार विक्री केलेली आहे.

त्यानंतर सदर मिळकत ही सविता राधेशाम सौंदर यांनी खरेदी केलेली आहे व ते सध्या सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत.

तथापी, वर नमूद नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१०५/२००७, नोंदणीकृत क्र. १५७१/२००९ व नोंदणीकृत खरेदीखत क्र.५९५३/२०१४ या तिन्ही खरेदीखताच्या मुळ प्रती व नोंदणी पावत्या सविता राधेशाम सौंदर यांचेकडून गहाळ झालेल्या आहेत.

सदर मिळकती बाबत नोंदविलेले मुळ नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१०५/२००७. नोंदणीकृत क्र. १५७१/२००९ व नोंदणीकृत खरेदीखत क्र. ५९५३/२०१४ व त्या सोबत असलेली मुळ नोंदणी पावती ही कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह कार्यालयात येऊन आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणिवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल. मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

डि ।। बीड सब डि. ।। बीड पैकी बीड जिल्हा परिषद, बीड हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, बीड यांचे कार्यक्षेत्रातील नगर परिषद मालमत्ता क्र. १-४-३४१२ (प्लॉट नं.१२०), सर्व्हे नं. ५५ तरफ गिराम, भक्ती कन्स्ट्रक्शन, बीड, ता.जि.बीड, ज्याची चतुः सिमाः-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस प्लॉट | : | नं. १०३ |
| पश्चिमेस: | : | २० फुट रूंदीचा रस्ता |
| दक्षिणेस | : | प्लॉट नं. ११९ |
| उत्तरेस | : | वारभुवन यांचा प्लॉट नं. १२० पैकी |

सदर मिळकतीचे विद्यमान मालक :
सविता राधेशाम सौंदर
रा. पुंगणी, ता. माजलगाव, जि.बीड

**जाहीर नोटीस देणार**
**सविता राधेशाम सौंदर**
**मो.नं. ८८३३४३४४४० :**

दिनांक: २३-०३-२०२४

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस, वित्त संस्थांना, पतसंस्थांना, बँकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक प्रभाकर सोनाजी जाधव, रा. पिंपरगव्हाण रोड, बीड, ता. जि. बीड हे आहेत.

सदर मिळकत ही पुर्वीचे मालक आसाराम पंडितराव शिंदे वगैरे यांनी उज्वला अनिलकुमार मुनोत यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१०५/२००७ दिनांक १०-०७-२००७ अन्वये विक्री केलेली आहे. त्यानंतर सदर मिळकत उज्वला अनिलकुमार मुनोत यांनी सौ. प्रिती आनंद बोरा व इतर यांना नोंदणीकृत खरेदीखत क्र. ८८४/२००९ दिनांक २५-०३-२००९ नुसार विक्री केलेली आहे, त्यानंतर सदर मिळकत ही प्रभाकरराव सोनाजी जाधव यांनी खरेदी केलेली आहे व ते सध्या सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. तथापी, वर नमूद नोंदणीकृत खरेदीखत क्र.३१०५/२००७ आणि नोंदणीकृत क्र.८८४/२००९ या दोन्ही खरेदीखताच्या मुळ प्रती व नोंदणी पावत्या प्रभाकर सोनाजीराव जाधव यांचेकडून गहाळ झालेल्या आहेत.

सदर मिळकती बाबत नोंदविलेले मुळ नोंदणीकृत खरेदीखत क्र. ३१०५/२००७ आणि नोंदणीकृत क्र.८८४/२००९ व त्या सोबत असलेली मुळ नोंदणी पावती ही कागदपत्रे कोणत्याही बँकेत अथवा वित्तीय संस्थेत गहाण ठेवून कर्ज घेतलेले असल्यास अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांच्या नकलासह कार्यालयात येऊन आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत, ते त्यांनी जाणिवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजण्यात येईल. मग कोणाच्याही कर्ज बोजाची अथवा इतर कुठल्याही हक्क हितसंबंधाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

डि ।। बीड सब डि. ।। बीड पैकी बीड जिल्हा परिषद, बीड हद्दीतील मा. दुय्यम निबंधक साहेब, बीड यांचे कार्यक्षेत्रातील नगर परिषद मालमत्ता क्र.१-४-४१९९ (प्लॉट नं. १२४), सर्व्हे नं.५५ तरफ गिराम, भक्ती कन्स्ट्रक्शन, बीड, ता.जि.बीड, ज्याची चतुः सिमाः-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | प्लॉट नं. ९९ |
| पश्चिमेस | : | २० फुट रूंदीचा रस्ता |
| दक्षिणेस | : | प्लॉट नं. १२३ |
| उत्तरेस | : | प्लॉट नं. ९८ |

सदर मिळकतीचे विद्यमान मालक :
प्रभाकर सोनाजी जाधव
रा.पिंपरगव्हाण रोड, बीड

**जाहीर नोटीस देणार**
**प्रभाकर सोनाजी जाधव**
**मो.नं.८८३३४३४४४०**
**८६००१६४७५७**

# ३१ मार्चनंतरही कांद्यावरील निर्यातबंदी कायम

## सरकारचा मोठा निर्णय; शेतकरी संतप्त

कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक निराशाजनक बातमी समोर आली आहे. सध्या कांद्याच्या निर्यातीवर बंदी आहे. ही बंदी ३१ मार्चपर्यंत असल्याचं सरकारनं सांगितलं होतं. मात्र, आता ३१ मार्चनंतरही कांद्यावरील निर्यातबंदी कायम राहणार असल्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात शेतकऱ्यांसह विविध शेतकरी संघटना आक्रमक झाल्या आहेत. बोले तैसा न चाले अशाच प्रकारचं हे सरकार असल्याच्या भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

पुढील आदेशापर्यंत कांदा निर्यातबंदी कायम

३१ मार्चनंतरही कांद्यावरील निर्यातबंदी कायम राहणार असल्याचे परित्रक सरकारच्या वतीन काढण्यात आलं आहे. पुढील आदेश निघपर्यंत कांद्यावरील निर्यातबंदी कायम राहणार असल्याचं सरकारच्या वतीनं सांगण्यात आलं आहे. केंद्र सरकारनं ३१ मार्चपर्यंत कांदा निर्यातबंदी केली होती. ती ३१ मार्चला उठेल अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, केंद्र सरकारनं पुढील आदेशापर्यंत कांदा निर्यातबंदी कायम ठेवली आहे. देशांतर्गत बाजारपेठेतील उपलब्धता आणि किमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी निर्यातबंदीचा निर्णय घेतल्याचं केंद्राचं म्हणणं आहे.



८ डिसेंबर २०२३ रोजी कांद्याच्या निर्यातीवर घातली होती बंदी

केंद्र सरकारनं ८ डिसेंबर २०२३ रोजी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घालण्याचा निर्णय घालण्याचा निर्णय घेतला होता. यावेळी ही निर्यातबंदी ३१ मार्चपर्यंत कायम ठेवण्याचा निर्णय सरकारनं घेतला होता. त्यामुळं ३१ मार्चनंतर तरी सरकार कांद्यावरील निर्यातबंदी उठवेल अशी अपेक्षा देशासह महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना होती. मात्र, तसे काही झाले नाही. ३१ मार्चनंतर देखील कांद्याच्या निर्यातीवरील बंदी कायम ठेवणार असल्याचा निर्णय सरकारनं घेतलाय. त्यामुळं विविध शेतकरी संघटनांसह शेतकरी देखील आक्रमक झालेत. सरकारनं तातडीनं त्यांचा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा तीव्र स्वरुपाचं आंदोलन करणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिलाय.

केंद्र सरकार सध्या महागाई नियंत्रणात आणण्यासाठी विविध धोरणं आखत आहे. यातीलच एक धोरण म्हणजे कांद्यावरील निर्यातबंदी आहे. कांद्याच्या किंमती वाढू नये. सामान्य लोकांच्या खिशाला कात्री लागू नये म्हणून सरकार प्रयत्न करत आहे. कारण सध्या लोकसभेच्या निवडणुका सुरु झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मतदारांना खुश करण्यासाठी सरकार असे निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. मात्र, दुसऱ्या बाजूल सरकारच्या या निर्णयामुळं देशातील शेतकरी मात्र संतप्त होत आहे. कारण कांद्यावर निर्यातबंदी केल्यामुळं दरात मोठी घसरण झाली आहे. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. त्यामुळं तातडीनं निर्यातबंदी उठवावी अशी मागणी शेतकरी करतायेत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१३०७ : देवगिरीचा वैभवशाली सम्राट रामदेवराव यादव यास मलिक काफूरने कैद करुन दिल्लीला नेले. चैत्र व. ४
१६७७ : दक्षिण दिग्विजयप्रसंगी शिवाजी महाराजांनी श्री शैल्य मल्लिकार्जुन येथे मुक्काम केला.
१८५५ : आग्रा आणि कलकत्ता यांदरम्यान तारसेवा सुरू झाली.
१८३६ : कॅनडा देशाने आफ्रिकन कॅनेडियन लोकांना मतदानाचा अधिकार दिला.
१८३७ : कॅनडा देशातील अश्वेत नागरिकांना मतदान करण्याचा अधिकार मिळाला.
१८८३ : शिकागो व न्यूयार्क या दोन शहरादरम्यान सर्वप्रथम दूरध्वनीवर बोलचाल करण्यात आली.
१८९६ : अ.एस. पोपोव यांनी इतिहासात पहिल्यांदाच रेडिओ सिग्नल चे प्रसारण केले.
१९२३ : ग्रीस हे राष्ट्र प्रजासत्ताक बनले.
१९२९ : लाहोर काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन
१९६२ : जागतिक क्षय रोग दिन
१९७७ : मोरारजी देसाई यांचा भारताचे पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला व काँग्रेसची तीस वर्षाची सत्ता संपुष्टात झाली.
१९९३ : शूमाकर-लेव्ही-९ या धूमकेतुचा शोध लागला. हा धूमकेतु जुलै महिन्यात गुरु ग्रहावर जाऊन आदळला.
१९९८ : 'टायटॅनिक' चित्रपटाला विक्रमी ११ ऑस्कर पुरस्कार मिळाले.
२००८ : भूतान हे लोकशाही राष्ट्र बनले व प्रथमच निवडणुका घेण्यात आल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७५ : मुथुस्वामी दीक्षीतार तामिळ कवी व संगीतकार (मृत्यू: २१ आक्टोबर १८३५)
१७९३ : कागदी चलनाचे जनक समजले जाणारे थॉमस रुझवेल्ट.
१८४१ : ब्रिटीश भारतातील मुस्लीम राजनेता व भारतीय मुस्लीम लीगचे संस्थापक नवाब विकार-उल-मुल्क कबोह यांचा जन्मदिन. यांचे मुळ नाव मुश्ताक हुसेन झुबेरी असून त्यांना नवाब विकार-उल-मुल्क मौलवी या नावाने देखील ओळखले जाते.
१८६३ : ब्रिटीश भारतातील एक प्रख्यात वकील आणि राजकारणी सत्येंद्र प्रसन्न सिन्हा यांचा जन्मदिन.
१८९२ : भारतीय राजनेता आणि भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ता हरिभाऊ उपाध्याय यांचा जन्मदिन. सन १९५२-५६ साली त्यांनी अजमेर राज्याचे मुख्यमंत्री पद भूषविले होते.
१९०१ : अमेरिकन ॲनिमेटर मिकी माऊस चे सह निर्माते अनब्लॉक आय्व्रेक्स यांचा जन्म. (मृत्यू: ७ जुलै १९७१)
१९२२ : भारतीय कर्नाटिक संगीतकार तसेच तमिळ चित्रपटसृष्टीतील पार्श्वगायक थोगुलुवा मीनाची अयंगर सौन्दराराजन उर्फ टीएमस यांचा जन्मदिन.
१९२४ : ज्ञानपीठ विजेते बिरेंद्रकुमार भट्टाचार्य.
१९३० : स्टीव्ह मॅकक्वीन हॉलिवूड अभिनेता (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९८०)
१९५१ : टॉमी हिल्फायगर अमेरिकन फॅशन डिझायनर
१९६५ : अमेरिकन प्रोफेशनल रेसलर व सध्या डब्ल्यूडब्ल्यूई रेसलिग स्पर्धेत कार्यरत असलेले अंडरटेकर या नावाने ओळखले जाणारे मार्क विल्यम कॅलवे यांचा जन्मदिन.
१९६६ : भारतीय राजकारणी व उद्योगपती जयदेव गल्ला यांचा जन्मदिन.
१९७९ : हिंदी चित्रपट अभिनेता इमरान हाशमी यांचा जन्मदिन.
१९८४ : भारतीय हॉकी खेळाडू एड्रियन डिसूझा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६०३ : एलिझाबेथ पहिली, इंग्लंडची राणी.
१८४९ : योहान वुल्फगँग डोबेरायनर जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: १३ डिसेंबर १७८०)
१८८२ : एच. डब्ल्यू. लॉंगफेलो अमेरिकन नाटककार व कवी (जन्म: २७ फेब्रुवारी १८०७)
१९०५ : ज्यूल्स व्हर्न फ्रेन्च लेखक (जन्म: ८ फेब्रुवारी १८२८)
२००७ : श्रीपाद नारायण पेंडसे मराठी कथालेखक व कादंबरीकार (जन्म: ५ जानेवारी १९१३)

# शेतीसाठी वापरावयाची औजारे




खुरपे : हे लोखंडी पात्यांचे अर्धचंद्रकार असते. याची मूठ लाकडाची असते. गवत काढणी, खुरपणी या करता हे अवजार उपयुक्त ठरते. याचा उपयोग फक्त शेतातच होतो असे नाही तर परसबागेतही याचा वापर करता येतो.मोठे खुरपे : उंच वाढलेले गवत, धान्य व भाजीपाला कापण्यासाठी मोठ्या खुरपाचा वापर हा केला जातो.

खुरपी : ही खुरपी ॲल्युमिनिअमची अथवा लोखंडाची असून अनेक आकारांत बाजारात उपलब्ध असते. टोपल्यात माती भरण्यासाठी व माती काढण्यासाठी हिचा वापर होतो.

`सिंकी : म्हणजे खुरपे लावलेला लाकडी दांडा होय. झाडाच्या उंच शेंडयावरील फांद्या काढण्यासाठी या खुरपे लावलेल्या दांड्याचा वापर करतात.

कोयता : हा लोखंडी व जाड असतो, एका बाजूला धार असते व याला लाकडाची मूठ असते. झाडाच्या छोट्या फाद्या तोडण्यासाठी हा वापरतात.

कुऱ्हाड : हे पुढे पाते असलेले लांब लाकडी दांड्याचे अवजार आहे. कुऱ्हाडीने झाडाच्या मोठ्या फाद्या तोडता येतात किंवा लाकडे फोडता येतात.

कुदळ : मुरमाड व कठीण जमीन खोदण्यासाठी कुदळ वापरतात. कुदळीलाच टिकाव म्हणतात.

फावडे : जमीन उकरण्यासाठी, माती उचलण्यासाठी, माती समांतर करण्यासाठी फावड्याचा वापर केला जातो.

नांगर : नांगर म्हणजे शेतात नांगरणीसाठी वापरण्यात येणारे उपकरण. बैलांच्या साहाय्याने हे चालविले जाते. याचा उपयोग सरी (लांबट वाफे) तयार करण्यासाठीही केला जातो. नांगराद्वारे जमीन नीट उकरली जाते. नांगर पूरणपणे लाकडी किंवा पूरणपणे लोखंडी असतात. काही नांगर लाकडाचे असून त्यां खाली लोखंडी फाळ लावलेला असतो..

अऊत : याला औत असेही म्हणतात. हे लाकडाचे असते. याला समोर ओढण्यासाठी एक किंवा दोन बैल जोडायला आडवी काठी असते, आणि मागे लोखंडी टोक असते. अऊताच्या खालच्या भागाला फाळ असे म्हणतात. फाळ जमीन उकरते व जमीन नांगरली जाते. गोफण : शेतीतील धान्य पक्षांनी, प्राण्यांनी खाऊ नये म्हणून त्यांना दगड मारून पळविण्यासाठी वापरण्यात येणारे एक मानवचलित उपकरण.. हे गोफासारखे विणलेले असते. याच्या दोन दोऱ्यांच्या मध्ये असलेल्या विशिष्ट जागेत दगड ठेवतात. त्यानंतर गोफण हातात धरून वेगाने स्वतःचे डोक्याभोवती चक्राकार आणि जमिनीस समांतर अशी फिरविली जाते. आवश्यक वेग आल्यावर मग त्यातील एक दोरी सोडतात. त्यामुळे दगड वेगाने सुटतो आणि नियोजित जागी जाऊन पक्षी, प्राणी यांना पिकाची नासाडी करण्यापासून दूर ठेवण्यास मदत करतो. डवरा : म्हणजे शेतात डवरणीसाठी वापरण्यात येणारे अवजार आहे. जे बैलांच्या साहाय्याने चालविले जाते. तिफण : शेतीसाठी वापरण्यात येणारे एक अवजार आहे. याच्या साहाय्याने बियांची पेरणी होते. शेतातून फिरता फिरता याच्यातून बिया खाली नांगरलेल्या सरींमध्ये पडतात. त्यांवर माती ढकलल्यावर पेरणी पूर्ण होते.

कुळव : शेतजमीन नांगरल्यानंतर निघालेली ढेकळे फोडून तणकटे मोकळी करणे, जेणेकरून ती वेचून जमीन स्वच्छ करता येईल आणि माती भुसभुशीत करण्यासाठी कुळवाचा वापर केला जातो. हँडपंप : या पंपाची बॉडी व इतर पार्ट्स पितळेचे बनलेले असतात. यास कीटकनाशक फवारणीचा पंप देखील म्हणतात. रोपांवर पडलेली कीड, किडे व पतंग नष्ट करण्यासाठी हँडपंपाचा वापर केला जातो. कटर : हा कटर कात्रीसारखा दोन पात्यांचा असतो. गवत कापण्यासाठी या अवजाराचा वापर केला जातो.

# कोरफड शेती कशी करावी?

कोरफड औषधी वनस्पती आहे. तिचा वापर खाद्यपदार्थ, सौंदर्यप्रसाधनांमध्ये व औषधी मलम बनवण्यासाठी केला जातो. कोरफड पिकाच्या रोपांना कीड व रोगाचा प्रादुर्भाव कमी असतो त्यामुळे कमी खर्चात चांगला नफा मिळवण्यासाठी कोरफड शेती एक चांगला पर्याय आहे. कोरफड शेतीसाठी जमीन : कोरफड लागवड कोरडवाहू, मध्यम किंवा खडकाळ जमिनीत केली जाऊ शकते. कोरफड लागवडीसाठी जमिनीचा पीएच सहा ते सात असल्यास पीक चांगले येते. कोरफड लागवडीसाठी चिकन माती त्या जमिनीची निवड करू नये. चिकन मातीमध्ये पाणी साचून राहण्याचा त्रास होतो.

कोरफड लागवडीची वेळ : कोरफड लागवड पूर्ण वर्षभर करता येते. पावसाळ्यामध्ये किंवा हिवाळ्यात हिची लागवड केल्यास चांगले उत्पादन मिळते.

कोरफड लागवड पद्धत : कोरफडीची लागवड बियाणे, रोपे तसेच कटिंग या पद्धतीनेही करता येते. बियाणे लावून लागवड केल्यास रोप तयार होण्यासाठी वेळ जास्त लागतो. कोरफडीचे रोप लावल्यास लवकर उत्पादन मिळते.

कोरफड लागवडीमध्ये अंतर : कोरफड लागवड करताना दोन रोपांमध्ये ३० सेंटीमीटर किंवा ४५ सेंटीमीटर अंतरावर लावावीत. दोन ओळींमध्ये एक ते दीड मीटर अंतर ठेवावे.

कोरफड पिकाचे पाणी व्यवस्थापन : कोरफड लागवड केल्यानंतर पाण्याचा चांगला निचरा होणे गरजेचे असते. त्यामुळे कोरफड पिकाला जास्त पाणी देऊ नये. जास्त पाण्याने कोरफडच्या पानांमध्ये गेल तयार होतो व रोपांची वाढ खुंटते. कोरफडीच्या रोपांना सकाळी किंवा संध्याकाळी पाणी द्यावे. कोरफड पिकाला पाणी देण्यापूर्वी जमिनीतील ओलावा तपासा. जर जमिनीची ओल पातळी चांगली असेल तर कोरफडीला पाणी देण्याची गरज नाही.

कोरफड पिकाचे खत व्यवस्थापन : कोरफड पिकाला खताची फारशी आवश्यकता नसते. परंतु लागवडीच्या वेळी शेतात शेणखत व कंपोस्ट खत टाकावे. कोरफड पिकाला



दरवर्षी एक ते दोन वेळा घालावे. खत देताना एनपीके खताचा वापर करावा. त्यामध्ये नत्र:स्फुरद:पालाश यांचे प्रमाण १०:१०:१० असावे. कोरफडीला खत देण्यापूर्वी जमिनीचा पीएच तपासावा. जर पीएच सहा ते सात दरम्यान असल्यास कोरफडीच्या पिकाला खत घालावे. खत टाकताना रोपांच्या मुळावर खत पडणार नाही याची काळजी घ्यावी. कोरफडीला खत देताना रात्री किंवा सकाळी थोड्या वेळाने पाणी द्यावे. कोरफडीला प्रमाणात खत घालावे जास्त खत देऊ नये. जास्त खत दिल्याने कोरफड रोपांच्या वाढीला बाधा होऊ शकते.

कोरफड पिकावर रोग व किडीचा प्रादुर्भाव : कोरफडच्या पिकावर रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. परंतु काही रोगांमुळे पिकाचे नुकसान होऊ शकते.

रोगांपासून बचाव करण्यासाठी उपाय योजना : कोरफड रोपांना योग्य जागेत लावा. कोरफड रोपांना योग्य प्रमाणात पाणी द्या. कोरफड योग्य प्रमाणात खत द्या. कोरफड रोपांना नियमित तपासा व रोगग्रस्त पाने काढून टाका. कोरफड लोकांना कीटकांपासून संरक्षणासाठी कीटकनाशकाची फवारणी करा.

कोरफड पिकाची कापणी : लागवड केल्यापासून सहा ते आठ महिन्यानंतर कोरफडीची कापणी करता येते.

कोरफडीचे उत्पादन : कोरफडीचे उत्पादन एका हेक्टर मध्ये पंधरा ते वीस टन पर्यंत होऊ शकते. हे उत्पादन कोरफडीच्या प्रजाती नुसार, वातावरण व देखभालीनुसार कमी अधिक होऊ शकते. आपल्या देशात सुमारे १५ टन हेक्टरी उत्पादन कोरफडीच्या पिकाला होते.

# टोमॅटोच्या भरघोस उत्पादनासाठी उपाययोजना

टोमॅटोचे भरघोस उत्पादन मिळवण्यासाठी खालील उपाय केल्यास तुम्हाला भरपूर उत्पादन मिळेल.

योग्य जात निवडा : टोमॅटोचे भरपूर उत्पादनासाठी टोमॅटोच्या योग्य वाणाची निवड करणे गरजेचे असते. तुमच्या हवामानाशी जुळत्या टोमॅटोच्या जातीची निवड करावी. जर तुम्ही हिवाळ्यात टोमॅटोची लागवड करत असाल तर वेगळ्या वाणाची निवड करावी. तसेच, उन्हाळ्यात टोमॅटोच्या लागवडीसाठी योग्य जातीची निवड करावी.

टोमॅटो लागवडीपूर्वी जमिनीची मशागत : टोमॅटोचे भरपूर उत्पादनासाठी टोमॅटो लागवडी पूर्वी जमिनीचे माती परीक्षण करून पहावे. त्यामुळे सुपीक जमीन बनवण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात याचे आकलन करता येईल. तसेच टोमॅटो लागवडीसाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन आवश्यक असते. जमिनीचा सामू तपासून घेतल्याने आवश्यक त्या उपाययोजना करून जमिनीचा पत वाढवण्याचा प्रयत्न करता येईल. टोमॅटोच्या लागवडीसाठी सुपीक जमीन असेल तर उत्पादन देखील भरपूर प्रमाणात होईल.

टोमॅटोची लागवड पद्धत : टोमॅटो लागवड करताना झाडाच्या मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी पानांचे पहिल्या सेटपर्यंत जमिनीत खोलीवर लागवड करावी. त्यामुळे झाडाचे मूळ खोलवर जातील. झाडाची वाढ होत असताना झाडाला काठीने किंवा इतर गोष्टीने आधार द्यावा व झाडाचा जमिनीशी असलेला संपर्क कमी करावा. यामुळे टोमॅटोचे



फळ जमिनीच्या संपर्कात येणार नाही व त्यापासून होणाऱ्या रोगाचा धोका कमी होईल. आणि त्यातून टोमॅटोचे भरपूर उत्पादन मिळेल.

पाणी व्यवस्थापन : टोमॅटोला नियमित पाणी देण्याची गरज असते. त्यासाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा. अन्यथा जास्त पाणी दिले गेले किंवा झाडाच्या पानाखाली पाणी गेल्याने मुळे कुजणे किंवा फळे फुटणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे योग्य पाणी व्यवस्थापन करणे टोमॅटोच्या भरपूर उत्पादनासाठी गरजेचे असते.

खत व्यवस्थापन : टोमॅटोच्या पिकाला संतुलित खत देणे गरजेचे असते. त्यासाठी फॉस्फरस पोटॅशियम आणि नायट्रोजन ने समृद्ध असलेले संतुलित खत वापरावे. नायट्रोजन पानांच्या वाढीत प्रोत्साहन देते, तर फॉस्फरस आणि पोटॅशियम फळांच्या वाढीसाठी महत्त्वाचे असते.

खत आणि बियाणे : उत्पादकांच्या सूचनांचे पालन खत व्यवस्थापन करताना करावे. योग्य खत व्यवस्थापनाने टोमॅटोचे उत्पादन भरपूर प्रमाणात मिळवता येऊ शकते.

झाडांची छाटणी : छाटणीमुळे झाडाची ऊर्जा फळांच्या उत्पादनाकडे नेण्यास मदत होते. त्यासाठी झाडाचे मुख्य खोड व फांद्यांमध्ये दिसणाऱ्या लहान कोंबांची खालची पाने काढून टाकावी. त्यामुळे हवेचा प्रवाह वाढतो, झाडावर रोग कमी पडतात, आणि मोठ्या आकाराची टोमॅटो झाडाला लागण्यासाठी ऊर्जा केंद्रित होते. टोमॅटोच्या झाडांच्या छाटणीचा भरपूर उत्पादन मिळण्यासाठी फायदा होतो.

कीड व रोग व्यवस्थापन : कीड व रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी सेंद्रिय कीटकनाशकांचा वापर करावा. तसेच माती पासून पसरणारे रोग टाळण्यासाठी पिके फिरवा. तसेच रोगाचा प्रादुर्भाव थांबवण्यासाठी रोगग्रस्त झाडे ताबडतोब काढून टाका.

टोमॅटोच्या पिकावर ॲसिडस सारख्या सामान्य किटकांवर लक्ष ठेवा. याचा प्रादुर्भाव झाल्यास उत्पादनात घट होते. योग्य वेळी कीड व रोग व्यवस्थापन केल्यास टोमॅटोचे भरपूर उत्पादन मिळण्यास फायदा होतो. टोमॅटोची योग्य वेळी काढणी करा : जास्तीत जास्त उत्पादन आणि चव येण्यासाठी टोमॅटोची काढणी कधी करावी हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

जेव्हा टोमॅटो पूर्णपणे रंगीत असतात आणि टनक असतात तेव्हा टोमॅटोची काढणी करण्याची योग्य वेळ असते. टोमॅटोची कापणी करताना खोडापासून काढण्यासाठी फळाला हळुवारपणे मिळावे किंवा कात्रीने छाटणी करावी. निष्कर्ष : टोमॅटोच्या उत्पादनांना चालना देण्यासाठी वरील दिलेल्या टिप्सचा वापर करा. व टोमॅटोच्या पिकाची काळजी घ्या. वरील दहा टिप्स चा वापर करून तुम्ही चांगल्या दर्जाच्या टोमॅटोच्या उच्च उत्पादनाची अपेक्षा करू शकता. योग्य वाण निवडण्यापासून माती परीक्षण करण्यापासून ते छाटणी आणि काढणी करेपर्यंत प्रत्येक टप्पा तुमच्या टोमॅटोचे उत्पादन वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.

# ५ गायीपासून दुग्ध व्यवसायाला सुरुवात

अलीकडच्या काळात अनेक तरुण-तरुणी नवनवीन व्यवसायात उतरताना दिसत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन व्यवसायातून चांगला नफा मिळवत आहेत. यातीलच एक व्यवसाय म्हणजे दुग्ध व्यवसाय आज आपण अशाच एका दुग्ध व्यवसायात यशस्वी झालेल्या महिलेची यशोगाथा पाहणार आहोत. या महिलेनं फक्त ५ गायींपासून सुरु केलेल्या व्यवसाय आज ४६ गायींवर गेला आहे. या माध्यमातून ती दरमहा लाखो रुपयांचा नफा मिळवत आहे. पाहुयात या महिलेची यशोगाथा

दररोज ६५० लिटर दूध डेअरीला

कष्ट करण्याची तयारी आणि उत्तम नियोजन केलं तर दुग्ध व्यवसाय देखील चांगला नफा मिळवून देणारा व्यवसाय आहे. कमी खर्चात मोठा नफा या व्यवसायातून मिळतो. कर्नाटकमधील तुमकुरु जिल्ह्यातील कोरटागेरे तालुक्यातील राजेश्वरी या महिलेनं दुग्ध व्यवसायातून स्वतःची प्रगती साधलीय. राजेश्वरी यांनी ५ गायींपासून व्यवसायाची सुरुवात केली होती. आज त्यांच्याकडे ४६ गायी असून दररोज ६५० लिटर दूध डेअरीला जाते. यातून राजेश्वरी दरमहा ७ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत आहेत. त्यांच्या या दुग्ध व्यवसायाला अनेक पुरस्कार देखील मिळाले आहेत.

कमी खर्चात मोठा नफा

राजेश्वरी यांनी सुरु केलेल्या दुग्ध व्यवसायाचा सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे. राजेश्वरी यांनी २०१९ साली दुग्ध व्यवसायाला सुरुवात केली होती. सुरुवातीला राजेश्वरी यांच्याकडे फक्त पाच गायी होत्या. मात्र, त्यानंतरच्या काळात त्यांनी हळूहळू गायींचा व्याप वाढवला. आज त्यांच्याकडे ४६ गायी आहेत. त्या दररोज कर्नाटक मिल्क फेडरेशनला ६५० लिटर दूध घालतात. या माध्यमातून त्या मोठा आर्थिक नफा मिळवत आहेत. अनेक महिला शेतकऱ्यांना राजेश्वरी यांचा आदर्श घेऊन दुग्ध व्यवसाय सुरु केला आहे. अनेक महिलांना राजेश्वरी मार्गदर्शन देखील करत आहेत.

# ४ लाख रुपये खर्च करून सिंधीच्या झाडांची बहरली बाग

## महसूल विभागाच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यावर आली उपासमारीची वेळ! | राजेगाव येथील अल्प भुधारक शेतकरी तुकाराम तेलंगची व्यथा! | सिंधी (नीरा)पिण्याचे १२ आजारावर प्रभावी औषध - तुकाराम तेलंग

**ज्योतिराम पाढंरपोटे**
**माजलगव**

बीड जिल्ह्यातील शेतकऱ्याचा नादच खुळा म्हणतात ते काही अंशी खरं आहे.शेतकरी आपल्या शेतात काय लावेल हे सांगता येत नाही त्यात माजलगाव तालुक्यातील शेतकरी जरा दोन पाउल पुढेच असतो तालुक्यात सफरचं,ड्रॅगन फूड,सिताफळ,निवडूंग,मोसंबी,लिंबू,केशर आंबा,बोर,जांभळ व डाळींबआदी पिके घेऊन शेतकऱ्यांना अशक्य असे या जगात काहीच नाही हे सिद्ध करून दाखवले आहे असाच आणखीन एक नवीन प्रयोग तालुक्यातील राजेगाव येथील अल्पभूधारक सातवी पास असलेले शेतकरी तुकाराम बाबुराव तेलंग या ५१ वर्षीय शेतकऱ्याने एक अनोखा उपक्रम करून दाखवला आहे.त्यांनी आपल्या अडीच एकर जमिनीपैकी एक एकर जमिनीवर सुमारे ७५० अस्सल गावरान सिंधीची झाडं लावली आहेत. मात्र महसूल विभागाला सिंधी विक्री करण्यासाठी दुकान परवान्यासाठी खूप वेळा चकरा मारून ही केवळ महसूल अधिकाऱ्यांच्या उदासिनतेमुळे तुकाराम तेलंग या शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.शुद्ध गावरान सिंधी (निरा) सेवावनाने माणसातील विविध १२ आजार दुरुस्त होतात असा दावा ही तेलंग यांनी केला आहे.

माजलगाव शहरा पासून सुमारे २५ की. मी.अंतरावर राजेगाव हे जनावरांच्या बाजारासाठी मराठवाड्यात प्रसिद्ध आहे. याठिकाणचे तुकाराम बाबुराव तेलंग हे (तेलंग जातीचे मूळचे (तेलंगणा राज्यातले ) एक अल्प भुधारक शेतकरी आपली पत्नी आणि चार मुलं व आईसोबत राहतात त्यांना एकूण फक्त अडीच एकर जमीन (गट नं ५४ ) राजेगाव याच शिवारात आहे.पारंपरिक पिकं न घेता काहीतरी वेगळं केली पाहिजे म्हणून त्यांनी ९ वर्षा पूर्वी २०१५ ला सिंधीचे बेनं लागवडीचा विचार केला.आपल्या अडीच एकर जमिनी पैकी त्यांनी एक एकर जमीनीमध्ये त्यांनी आंध्रा प्रदेशातीलराजमंद्री येथून सुमारे ७५० रोपे ३७९/रुपाये प्रमाणे खरेदी केले आणि १४ बाय ७ फुटावर या झाडांची लागवड केली.या झांडाना पाण्याचे व्यवस्थापन व्हावे यासाठी त्यांनी एक बोअरवेल खोदून पाणी नियोजन केले.आजघडीलाही झाडे सिंधी धरण्यासाठी तयार आहेत.

एका झाडापासून दिवसाला दीड ते दोन लिटर सिंधी निघते एक झाड दोन महिने सिंधी देते नंतर या झाडाला आठ महिने सोडून देतात आज या सिंधीला भावा प्रमाणे ५० ते ५५ रु प्रति लिटर विकला जातो मात्र योग्य बाजारपेठ व स्वतःचे दुकान नसल्याने पिकतय पण, विकाताही येईना अशीवेळ या शेतकऱ्यांवर आली आहे.आजतागायत संपुर्ण सिंधी लागवड ते संपूर्ण संगोपनासाठी माझा चार लाखापेक्षा अधिक खर्च झाला आहे.अधिकृत सिंधी विकण्यासाठी महसूल विभागचा परवाना लागतो त्यासाठी त्यांनी येथील तहसील कार्यालयात अनेक वेळा खेटे मारले मात्र केवळ संबधीत अधिकाऱ्यांच्या उदासीन धोरणामुळे आज माझ्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असल्याची खंत तुकाराम तेलंग या शेतकऱ्यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलून दाखवली.मी एक गरीब शेतकरी आहे माझ्यावर माझ्या कुटुंबातील तीन मुली एक मुलगा व आई वडिलांची जबाबदारी व मुलांच्या शिक्षणाचा भार आहे त्यामुळे शासनाने माझी हलाकीची परिस्थिती पाहता मला आर्थिक मदत करावी अशी विनंती ही त्यांनी शासनाकडे केली आहे.





**आजारावर सिंधी (निरा) गुणकारी :** अनेक आजारावर शुद्ध व सकाळी दिवस निघण्या अगोदर ही सिंधी प्राशन केली तर उन्हाची दाह कमी होते,मुतखडा,गॅसेस,कावीळ,टायफाइड ,मुडदूस,भूक लागते,क्षयरोग,हाडाची मजबुती,कोड आदी सह १२ विविध आजारावर ही सिंधी (निरा) गुणकारी असल्याचे तुकाराम तेलंग यांचे म्हणणे आहे शिवाय सिंधीच्या फांद्या पासून डाली,फडे(झाडु),दुरडी,विविध शोभेच्या वस्तू व शेतीसाठी लागणारे साहित्य बनवले जाते तर याच्या फळांचे सेवन केल्यास मूळव्याध वर गुणकारी आहे असे ही ते सांगतात.

### सिंधी शरीरासाठी आरोग्य वर्धक

सकाळी दिवस निघण्या अगोदर नीरा जिची चव गोड व किंचित आंबट असते हे एक आरोग्य वर्धक पेय आहे आणि दिवस निघाल्या नंतर नीरा या पेयाचे सिंधी मध्ये रूपांतर होते सिंधीची चव ही आंबट व खारट असतेसिंधीच्या अतिसेवनाने माणसाला गुंगी येऊ शकते म्हणून त्याचे सेवन हे लिमिट मध्ये असावे असे ही तेलंग यांनी आवर्जून सांगितले

## थोडक्यात




### वसंतदादा पाटील महाविद्यालयात शहीद दिन

पाटोदा - येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २३ मार्च रोजी शहीद दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या अभिवादन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रोफेसर गणेश पाचकोरे होते. त्यांच्या हस्ते शहीद भगतसिंग, शहीद राजगुरू व शहीद सुखदेव यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमालार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ.ज्ञानेश्वर चौधरी, आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनोजकुमार प्रकाश, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दिलीप गिऱ्हे, कर्मचारी कल्याण समिती सचिव डॉ. काकासाहेब पोकळे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत देशमुख, प्रा. मनिषा गाढवे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. काकासाहेब पोकळे यांनी शहीद भगतसिंग, शहीद राजगुरू व शहीद सुखदेव यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत दिलेल्या बलिदानावर अत्यंत भावुक भाष्य केले. यानंतर 'वंदे मातरम' व 'इन्कलाब जिंदाबाद' या घोषणा देऊन अभिवादन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. कुशाबा साळुंके यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### केज पोलीसानी वाचविला वीस गाईचा जीव

केज : कत्तलीच्या उद्देशाने अवैध वाहतूक करीत गाईंना घेवून जाणाऱ्या टेम्पो मालकाला १,२७,१०० रू खावटी देण्याचा आदेश जय गौमाता जय श्रीराम केज पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीमध्ये २० मुक्या जीवांना आईशेर टेम्पो मध्ये दाटीवाटीने कत्तलिसाठी नेहण्याच्या उद्देशाने भरले होते यात १४ लहान वासरे व ६ मोठे गाई बैल भरून जात असताना पकडले , त्यांनतर गुन्हा नोंद करून सदर पशुधन गोशाळेत पुढील आदेशापर्यंत सोडण्यात आले . केज न्यायालयात टेंपो मिळावा म्हणून टेम्पो मालकांनी अर्ज दाखल केला असता मा न्यायालयांनी टेम्पो मालकास जप्त पशुधनाच्या संगोपन, संवर्धन खर्च हा १,२७,१०० रु देण्याचा आदेश केला. अन्यथा सबब खर्च लोकल अथॉरिटी ऑफ अरियरास ऑफ लैंड रेवेनिव्यू प्रमाणे वसूल करण्यात येईल.तसेच सबब खर्च जोपर्यंत जमा नाही केला जात तोपर्यंत टेम्पो हा पोलिसांकडे जमा राहील असा आदेश केला असून यात सरकार पक्षातर्फे ॲड देशपांडे व गोशाळेच्या वतीने ॲड अशोक मुंडे यांनी काम पाहिले

### केएसके महाविद्यालयात शहीद दिन साजरा

बीड: येथील सौ केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात शहीद दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ संजय पाटील देवळाणकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ नारायण काकडे,पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ सतीश माऊलगे, डॉ.सुधाकर गुट्टे,पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर, कार्यालयीन अधीक्षक डॉ विश्वांबर देशमाने, कर्मचारी प्रतिनिधी डॉ.विनायक चौधरी डॉ.दुश्यंता रामटेके व प्रा. आसाराम खुटाळे इत्यादी सह महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




## यशासाठी मानसिकता,अभ्यासात एकाग्रता व परिश्रमाची आवश्यकता- भगवान अहिरे

बीड । प्रतिनिधी

जगात ज्ञानवंताला महत्व आहे. ज्ञानवंत होण्यासाठी अभ्यास महत्वाचा असून आपल्याला आपले ध्येय साकार करण्यासाठी नियोजनपूर्वक परीश्रम करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा हा करिअरच्या दृष्टीने महत्वाचा पर्याय असून यात यश संपादन करण्यासाठी आपली मानसिक तयारी असायला हवी यानंतर अभ्यासात एकाग्रता व मोबाईल पासून दूर राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन संगमनेर येथील साई करियर अकॅडमीचे संचालक भगवान अहिरे यांनी केले. येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व गणित विभाग यांच्या वतीने दि. २३ मार्च रोजी सेट-नेट व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.




अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.संतोष उंदरे होते तर मंचावर गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. अनिल चिंधे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. रवींद्र काळे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी भगवान अहिरे यांनी स्पर्धा परीक्षेचे स्वरूप, पात्रता, कोणकोणत्या स्पर्धा परीक्षा असतात, त्यांचा अभ्यासक्रम यासोबतच या परीक्षांची काठिण्यपातळी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना या परीक्षांविषयी प्रेरणा देताना ज्यांनी कठोर मेहनत घेऊन यश संपादन केले आहे अशा व्यक्तींची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. संतोष उंदरे म्हणाले की, स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी आज मोठ्या प्रमाणात संदर्भ साहित्य उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन करून, सातत्य ठेऊन परिश्रमपूर्वक अभ्यास केल्यास यश निश्चित मिळते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.अनिल चिंधे यांनी केले तर आभार डॉ. प्रमोद जावळेपाटील यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आचारसंहितेत ही मशाल सताड उघडी तिला झाका -युसूफ़

बीड । प्रतिनिधी

सध्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू आहे. याचे पालन करताना काही बाबी मात्र प्रशासनाकडून सुटत आहेत. अशाचप्रकारे बीड शहरातील तुळजाई चौकात नगर परिषदेने लावलेली ही मशाल सुद्धा सुटली आहे. तिच्यावर काहीतरी टाकून झाकणे आवश्यक आहे. या उघड्या मशालीमुळे निवडणुकीत उतरणाऱ्या एका राजकीय पक्षाचा प्रचार व प्रसार होत आहे. जे आदर्श आचारसंहितेला मारक असून आचारसंहितेचे उल्लंघन करणारे आहे. असे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.



काही दिवसांपूर्वी आदर्श आचारसंहितेचे पालन करताना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकालगत असलेल्या मल्टीपर्पज मैदानाच्या कमानीवरून माजी नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या कोरलेल्या नावाकडे प्रसिद्धी माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. याची प्रशासनाने तत्परतेने दखल घेऊन ते नाव झाकले. असे असताना बीड शहरातील मोठ्या चौकांपैकी एक चौक असलेल्या तुळजाई चौकातील ही एवढी मोठी मशाल मात्र आचारसंहितेच्या अंमलबजावणीतून अद्यापपर्यंत सुटलेली आहे. मशाल हे निवडणुकीत उतरणाऱ्या एका राजकीय पक्षाचे निवडणूक चिन्ह आहे. याकडे बहुतेक प्रशासनाचे अजूनही लक्ष गेले नाही म्हणून पुन्हा एकदा आचारसंहितेच्या अंमलबजावणी करिता प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे व प्रशासनाकडून सदरील मशाल झाकण्यात यावी जेणेकरून आचारसंहितेचे पालनही होईल व निवडणूक लढविणाऱ्या एका पक्षाचा प्रचार व प्रसार होणार नाही. तेव्हा या मशाललाही लोकसभा निवडणुकीचा निकाल येईपर्यंत तरी चांगले झाकून ठेवावे असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

## लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केज येथे शिवसेनेची आढावा बैठक

केज । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केज येथे शिवसेना जिल्हा संपर्क कार्यालयात शिवसेना,महिला आघाडी, युवा सेना पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे व केज विधानसभा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या उपस्थितीत व केज तालुका प्रमुख अशोक जाधव यांच्या नियोजनखाली संपन्न झाली. सदरील बैठकीस लोकसभा निवडणूक आढावा बूथ प्रमुख गटप्रमुख बांधणी आढावा तसेच गावनिहाय शाखाप्रमुख व शाखेची माहिती घेण्यात आली येणाऱ्या काळात शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांची ताकद दाखवण्याकरिता लोकसभा निवडणुकीत जिल्हाप्रमुख ते बूथ प्रमुख सर्व पदाधिकाऱ्यांनी व अंगीकृत संघटनांनी सर्व पदाधिकाऱ्यांनी एक जीवाने कामाला लागण्याचे आव्हान बैठकीत जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे विधानसभा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांनी केले.यावेळी केज तालुका प्रमुख अशोक जाधव उपजिल्हाप्रमुख दीपक मोराळे शहर प्रमुख तात्या रोडे यांनी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला.



या बैठकीला या बैठकीला डॉक्टर नयनाताई शिरसाट, जिल्हा सचिव रोहित कसबे, अंबाजोगाई तालुका प्रमुख बालासाहेब शेप,केजशहर प्रमुख तात्या रोडे, अंबाजोगाई शहर प्रमुख अशोक हेडे,जिल्हा सह संघटक दिलीप जाधव, उप जिल्हा संघटीका राधा ताई ढाकणे, तालुका संघटीका अश्विनी ताई बडे, तालुका संघटीका रेखा ताई घोबले, मोरे ताई, कॉलेज कक्ष किशोर घुले संघटक विनोद राऊत ,माजी तालुका प्रमुख जालिंदर आपेट, उप तालुका प्रमुख अभी घाटूळ , सुभाष ठोंबरे , धनराज गव्हाणे, तालुका संघटक सुधीर जाधव , तालुका सचिव सखाराम वायबसे,बाळासाहेब कसबे, लहू केदार रवि ठोबरे, ऋषिकेश घुले, गणेश निंगुळे, श्रीनाथ गालंडे मधुकर आंधारे,हरीश गित्ते, पप्पू ढगे ,राहूल फुके, अनिल खाडे, दिलीप वाघमारे,पिंटू चौरे, निलेश मुरकुटे, सुंदर रोडे, शिवराज धाकटोडे , अमोल जाधव,अंगद देशमुख, शुभम निंगुले सह शिवसैनिक व पदाधिकारि उपस्थित होते.

## शहिद दिनानिमित्त एआयएसएफचे व्याख्यान

बीड । प्रतिनिधी

भारताच्या स्वातंत्र्यासाठी २३ मार्च १९३१ रोजी फासावर गेलेल्या शहीदे आझम भगतसिंग सुखदेव राजगुरु यांना ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (एआयएसएफ) या विद्यार्थी संघटनेच्या आणि ऑल इंडिया युथ फेडरेशन (एआयवायएफ) या युवक संघटनेच्या वतीने बीड शहरातील बशीरगंज चौकात अभिवादन करण्यात आले आणि संघटनेच्या कार्यालयावर शहीद भगतसिंगांचे विचार आणि सद्य सामाजिक - राजकीय परिस्थिती या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.




२३ मार्च १९३१ रोजी देशाच्या स्वातंत्र्यासाठी हसत हसत फासावर जाणारे भगतसिंग, सुखदेव राजगुरु यांना आयडॉल मानणाऱ्या ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन आणि ऑल इंडिया युथ फेडरेशन या विद्यार्थी - युवक संघटना स्थापनेपासूनच भगतसिंगांच्या स्वप्नातील शोषणरहित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी भगतसिंगांच्या विचारांना घेऊन शोषण, अन्याय- अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करत आहेत. शहीद भगतसिंगांचे विचार विद्यार्थी युवकांना समजले पाहिजेत यासाठी वेळोवेळी संघटनेच्या वतीने अभ्यासवर्ग, व्याख्यान आणि शिबीराचे आयोजन केले जाते. आज शहीद दिनी भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना संघटनेच्या वतीने बीड शहरातील बशीरगंज चौकात भगसिंग, सुखदेव राजगुरु यांच्या प्रतिमेला घालून अभिवादन करण्यात आले. तसेच अभिवादन झाल्यानंतर संघटनेच्या कार्यालयावर शहीद भगतसिंगाचे विचार आणि सद्य सामाजिक आणि राजकीय परिस्थिती या विषयावर ॲड. भीमराव चव्हाण यांचे व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यान कार्यक्रमासाठी शिक्षक नेते कॉ. डी जी तांदळे, कॉ. राजकुमार कदम, विनोद सवासे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. भाऊराव प्रभाळे, ॲड. अंबादास आगे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॉ. भाऊराव प्रभाळे यांनी तर कॉ. राजकुमार कदम यांनी शहीद भगतसिंग यांच्या विचारला उजाळा दिला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप कॉ. डी जी तांदळे यांनी केला आणि आभारप्रदर्शन एआयवायएफचे कॉ. नितीन रांजवन यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कॉ. रामहरी मोरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय इंगोले, विनायक जगताप, विकास जगताप, योगेश वाघमारे, कृष्णा जगताप, रोहित चव्हाण, विवेक जगताप, अझहर शेख, सचिन केकान, रविंद्र बर्डे, सुधीर आपरे आदींनी परिश्रम घेतले.

## लिंबागणेश येथे शहीद दिनानिमित्त भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांना अभिवादन

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.२३ मार्च शनिवार रोजी शहिद दिनानिमित्त देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत आदरांजली वाहण्यात आली यावेळी सरपंच बालासाहेब जाधव,ग्रां.स.श्रीहरी निर्मळ,दामु थोरात, समीर शेख,अक्षय वाणी, रमेश गायकवाड, पत्रकार हरिओम क्षीरसागर, अँड.गणेश वाणी, विक्रांत वाणी भगवान मोरे, संतोष भोसले, गणपत तागड,भरत वाणी,ग्रां.कर्मचारी जिवन मुळे,कचरू निर्मळ आदि उपस्थित होते.शहिद दिनाचे महत्त्व विशद करताना सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी २३ मार्च रोजी दरवर्षी शहिद दिवस म्हणून देशभरात साजरा केला जात असुन



भारताला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या स्मरणार्थ देशभरात शहिद दिवस साजरा केला जातो.२३ मार्च१९३१ रोजी इंग्रजांनी सह भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या भारतमातेच्या वीर जवानांना फाशी दिली होती.त्यांच्या बलिदानामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्याला नवी दिशा मिळाली होती त्यामुळेच आजचा २३ मार्च दिवस शहीद दिन म्हणून साजरा करण्यात येतो.१९२८ मध्ये भारतातील घडामोडींचा अभ्यासासाठी इंग्लंडहून 'सायमन कमिशन ' नावाचं शिष्टमंडळ आले होते भारतात सर्वत्र या शिष्टमंडळाचा काळे झेंडे दाखवून निषेध करण्यात आला होता यावेळी लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा काढण्यात आला होता 'सायमन परत जा ' च्या घोषणांनी सारा परिसर दुमदुमला होता.जमाव पांगवण्यासाठी पोलिसांकडून करण्यात आलेल्या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला.देशभक्तीने भारावलेल्या क्रांतीकारकांना हे सहन झाले नाही.लालाजींच्या मृत्युस कारणीभूत असणाऱ्या लाहोर पोलिस ठाण्यातील इंग्रज अधिकारी सँडर्स याचा लालाजीच्या पहिल्या मासिक श्राद्धाच्या दिवशीच भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव तिघांनी गोळ्या झाडून खून केला. याप्रकरणी २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात तिघांना फाशी देण्यात आली शहिद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या स्मरणार्थ दरवर्षी २३ मार्च रोजी आदरांजली अर्पण करत शहिद दिवस भारतीय साजरा करतात.भगतसिंगाची हि लढाई केवळ राजकीय स्वातंत्र्याच्या पुरतीच मर्यादित नव्हती तर सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी होती.ब्रिटीशांच्या जोखडातून मुक्त करण्याबरोबरच समाजवादी रचनेवर आधारित समाज निर्माण करण्याचे भगतसिंगाचे स्वप्न होते.सर्व माणसांच्या अन्न वस्त्र निवारा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या मुलभूत अत्यावश्यक गरजा भागविण्याची सोय म्हणजे समाजवाद असे नमुद करताना भगतसिंगानी क्रांती म्हणजे सध्या अस्तित्वात असणारी साम्राज्यवादी , भांडवली समाज व्यवस्था संपूर्ण उलथून टाकून तिच्या जागी समाजवादी व्यवस्था प्रस्थापित करणे हे अंतिम ध्येय होते असे नमुद केले.

# जलजिवनमध्ये बोगसगीरी सुरु असतांना प्रकाश सोळंके झोपले का ?

## सत्तेसाठी धडपडणारे दर्जेदार कामे करून घेताना टक्केवारीसाठी तोंड काळे करतात ?





**माजलगाव । प्रतिनिधी**

देशातील नागरिकांना शुद्ध व मुबलक पाणी मिळावे यासाठी केंद्र शासनाकडून जलजिवन ही महत्वकांक्षी योजना राबवली जात आहे. मात्र माजलगाव मतदार संघातील गुत्तेदाराने या योजनेच कुरण करुन माया कमविण्याला पसंती दिली आहे. लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्याला हाताशी धरून गावचं पाणी पळविण्याचा महापाप या महाशयाने केले आहे. या गुत्तेदारांना व आमदार प्रकाश सोळंके ना गावातील सरपंच व लोकप्रतिनिधी जॉब विचारत नाहीत ही मात्र शोकांतिका आहे. आमदार सह तालुक्यातील नेत्यांनी विविध परिणे मलिदा पोहोचत असल्याने सर्वजण या पापात सहभागी होऊन भविष्यात पाण्यासाठी या महासाहयामुळे भटकंती होणार हे निश्चित असुन असे बोलले तर काही वावगे ठरू नये.

सर्वसामान्य माणसाला आता जलजीवनच्या प्रश्नावर आवाज उठविणे गरजेचे झाले आहे.

माजलगाव, वडवणी, धारुर या तालुक्यातील जल जीवन योजना चालु असलेले कामे हे बोगसगिरीचा नमुना म्हणावे लागतील. अक्षरशः जनाची नाही तर मनाची लाज ठेवून आमदार प्रकाश सोळंकी यांनी ज्या मतदार राजाने बहुमताने त्यांना आमदार केलं त्यांना विधानसभेमध्ये पाठवलं मात्र गुत्तेदाराकडू टक्केवारी खाताना लाज वाटली नाही का असा संतप्त प्रतिक्रिया माजलगाव मतदारसंघातील मतदार करीत आहेत. अगदी डांबरी रस्त्याच्या साईटच्या पंख्यातून पाईपलाईन नेहताना त्या गुत्तेदाराला लाज कशी नाही वाटली. मात्र उमरी, मंगरूळ यासह मतदारसंघातील गावातील या कामाची मंजुरी देताना व बिले देताना अधिकारी दारू पिला होता का? असा प्रश्न सर्वसामान्याला पडल्याशिवाय राहत नाही. साईट पंख्यातील भरलेला मरून खोदकामात स्वतः जात असताना अनेक बहादर अधिकाऱ्यांनी तर या खोदकामासाठी देखील ब्लास्टिंग करून वाढीव बिल काढली आहे. ज्या रस्त्याच्या कडेला लोक टेलेफोन केबल टाकताना विचार करतात त्या साईट पंख्यात पाईपलाईन टाकली जात असल्याने कामाचा दर्जा कसा होईल असा प्रश्न पडला आहे. भविष्यात मोठ्या पावसात या पाईप लाईन पाऊस पडल्याबरोबर उघड्या पडणार तर अवजड वाहन यावर गेल्यानंतर पाईप निन्क्रष्ट द०र्जाचे असल्याने लगेच फुटतिल एवढा नंगानाच आमदाराच्या टक्केवारी खाण्यामुळे झाला असून जर जीवांची बोगसगिरी चालू असताना आमदार आता मुग गिळून गप्प का? व गावातील सत्ताधारीला चिरीमिरी देऊन त्यांचे तोंड गप्प केले आहेत का असा प्रश्न उपस्थित होत आहे .



### गुत्तेदाराने लोकप्रतिनिधीला टक्केवारी दिल्यानेच अनेक ठिकाणी योजना बोगस

माजलगाव मतदार संघात जलजीवन योजनेवर कोट्यवधी रुपयांचा खर्च निधी मंजूर करण्यात आलेला आहे. मात्र अनेक गावात गुत्तेदार पोसण्यासाठीच ही योजना आणली असल्याचे चित्र आहे लाखो रुपयांची टक्केवारी लोकप्रतिनिधी खात असल्याने विहिर, पाईपलाईन, पाण्याची टाकी यासह अनेक कामे अपूर्ण असल्याचा प्रकार असून केवळ थातूर मातूर कामे करुन बिले उचलण्यासाठी गुत्तेदारांचा धडपडा सुरु असल्याचे दिसत आहे. आमदार प्रकाश सोळंके यांनी गुत्तेदांराना जॉब विचारून जल जीवन योजनेची कामे दर्जेदार करून घ्यावा अशी विनंती अनेक गावातुन नागरिक करीत आहेत.

### चौकशी समिती येण्यापुर्वी गुत्तेदार तक्रार,व अधिकारी बसवतात धाब्यावर

माजलगाव मतदार संघातील बोगस कामे करणाऱ्या काही कंत्राटदारांच्या कामांची राज्यस्तरीय चौकशी समितीकडून तपासणी करण्यासाठी आलेले अधिकारी या समितीच्या तपासणीत आपलं पितळ उघडं पडू नये यासाठी कंत्राटदारांकडून अधिकाऱ्यांना हाताशी धरुन अक्षरशः थातूर-मातूर कामं केली जात आहेत. साडे तीन फुट खोल पाईपलाईन करणं गरजेचं असतांना दोन ते अडीच फुट खोल पाईपलाईन, डांबरी रस्त्याच्या कडेने करून बोगसगिरी केली जात आहेत. एकदा का या योजनांची बिलं उचलली की ही गुत्तेदार मंडळी नौ दो ग्यारा होण्याच्या तयारीत असून त्यासाठी अधिकारी, गावपुढारी व तालुकास्तरावरच्या पुढाऱ्यांना मलिदा वाटून वाट्टेल तशी कामं करण्यावर त्यांनी भर दिला आहे.



पाटोदा : लोकनेत्या पंकजाताई मुंडे , प्रीतम ताई मुंडे व सुरेश (आण्णा) धस यांनी पाटोदा येथील तात्या पेट्रोलियम येथे भेट दिली असता सय्यद अब्बु शेठ व कुटुंबाच्या वतीने व सर्व पाटोदा शहराच्या,वतीने भव्य दिव्य सत्कार करण्यात आला.

## लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांचे माजलगाव भाजपाच्या वतीने स्वागत



**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी व महायुतीची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर दि २२ मार्च शुक्रवार रोजी प्रथमच बीड जिल्ह्यात धामणगांव येथे प्रवेश करत असताना बीड जिल्ह्याच्या सीमेवर महायुतीच्या बीड लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे व खासदार डॉ.प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांचे माजलगाव मतदार संघाच्या वतीने स्वागत करताना माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे भाजपा नेते रमेशराव आडसकर,भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के,भाजपाचे माजलगाव तालुकाध्यक्ष अरुण राऊत यांच्यासह कार्यकर्त्यांनी स्वागत केले.

## आंतरवली सराटी येथील महाबैठकीस धारूर तालुक्यातून हजारो बांधव जाणार

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

आचारसंहितेपूर्वी सरकारने सगेसोयरेची अंमलबजावणी करणे अपेक्षित होते. परंतु तसे झाले नाही. त्याउलट मराठा बांधवांवर गुन्हे दाखल करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न होत आहे. तसेच लोकसभेच्या निवडणुकाही तोंडावर आहेत. यावर समाजासोबत विचारमंथन करून, पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे.राज्यभरातील उपोषणकर्ते, सभांचे आयोजक, आंदोलनकर्ते, वकील, अभ्यासक व मराठा सेवक समाजबांधवांच्या बैठकीचे आयोजन केले आहे.

### उद्या मराठ्यांची निर्णायक बैठक

सगेसोयरे अध्यदेशाची अंमल बजावणी न केल्या मुळे पूढील आंदोलनाची दिशा ठरवणासाठी २४ मार्च रोजी बैठकीचे आयोजन केले आहे.मराठा समाजास कुणबी म्हणून ओबीसी मधून आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरागे पाटील यांनी मागील सात महिन्यापासून राज्यभर लढा उभारला आहे.या लढल्यास धारूर तालुक्यातील मराठा समजाने तन मन आणी धनाने या लढयात सहभाग घेतला आहे.सरकारने मराठा समाजास कुणबी म्हणून आरक्षण देण्यासाठी सगेसोयरे अध्यदेश काढला आहे पण या अध्यादेशाची अमलबजावणी केली नसल्या मुळे मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यानि पुन्हा एकदा आंदोलन उभारले आहे.लोकसभेची आचार संहितेचे पालन करत आपला लढा सुरु ठेवला आहे.अतरवली सराठी या ठिकाणी दी २४ मार्च रोजी महाबैठकीचे ओयजन केले आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाची पुढची दिशा ठरवण्यासाठी बोलावलेल्या बैठकीस ◀◀ पान २ वर

## निरंजनची सायकल गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनाचा प्रवास सोयीस्कर करेल – विवेकानंद शास्त्री

### गोरगरीब विद्यार्थ्यांना १०० सायकलची वाटप

**शिरूर । शंकर भालेकर**

दुष्काळजन्य परिस्थितीशी सामना करणारे शिरूर कासार तालुक्यातील अनाथ,गोरगरीब, शेतकऱ्यांच्या विद्यार्थ्यांना निरंजन सेवाभावी संस्थेने सायकल देऊन शैक्षणिक दिशादर्शवली आहे. यामुळे सहाजिक निरंजन ची ही सायकल गोरगरीब विद्यार्थ्यांच्या जीवनाचा प्रवास सोयीस्कर करेल असा विश्वास सिद्धेश्वर संस्थान शिरूर मठाधिपती महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी व्यक्त केला आहे.

धाकटी अलंकापुरी श्री. क्षेत्र सिद्धेश्वर संस्थान शिरूर येथे निरंजन सेवाभावी संस्था पुणे यांच्या ◀◀ पान २ वर




### जयेश कासट यांच्या मनाचा मोठेपणा...

सिद्धेश्वर संस्थानच्या सभागृहामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये भव्य स्वरूपात सायकल वाटपाचा सोहळा पडत असताना कार्यक्रमासाठी सजवलेल्या व्यासपीठावर मान्यवरांच्या खुर्च्यांमध्ये आपण न बसता निरंजन सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयेश कासट व्यासपीठांसमोरील पालकांच्या खुर्च्या बसून कार्यक्रमाचे मार्गदर्शन मात्र त्यांनी या ठिकाणी जाऊन व्यासपीठावर आपला मोठेपणा दाखवला पालकांसोबत कार्यक्रमाचा आनंद घेत होते. कार्यक्रमानंतर आलेल्या सर्व मान्यवरांना, पत्रकारांना कासट यांनी स्वतःच्या हाताने जेवण वाढवून जेवू घातले तरच आपण जेवण घेतले. त्यांचा हा मनाचा मोठेपणा सर्वांच्या मनाला भावुन गेला आहे.

## देवाच्या नाही तर शेतकऱ्याच्या नावाचा एकमेव कीर्तन महोत्सव

**परळी । प्रतिनिधी**

देवाच्या नावाने चालणारे अनेक कीर्तन महोत्सव पाहिले, परंतु शेतक-यांच्या नावाने सुरू असलेला हा एकमेव कीर्तन महोत्सव आहे, असा सूर शेतकरी कीर्तन महोत्सवात आलेल्या सर्व वक्त्यांच्या बोलण्यातून व्यक्त झाला. ख-या अर्थाने सामाजिक परिवर्तनाची ही सुरूवात म्हणता येईल, असे मतही अनेक वक्त्यांनी व्यक्त केले.

शेतकरी केंद्र स्थानी ठेऊन २१ गावातील लोकांच्या सहकार्यातून सुरू केलेल्या कीर्तन महोत्सवाचा दुसरा दवस विविध उपक्रमाने संपन्न झाला. सकाळी प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. हमीद दाभोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिर संपन्न झाले. या शिबिरात बीड जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांची टीमही सहभागी झाली होती. सुविधा वाढल्या,समाधान हरवले – डॉ. हमीद दाभोळकर



जग वेगाने बदलत आहे. विज्ञानाच्या प्रगतीने अनेक सुविधा वाढल्या आहेत. सुविधा वाढल्या असल्या तरी माणूस समाधानी झाला नाही उलट तो अधिक तणावात गेला आहे. विशेषतः १५ ते ३५ वयोगटातील तरुणांचे मानसिक स्वास्थ्य मोठ्या प्रमाणात बिडताना दिसत आहे. त्यातून आपल्या देशात वर्षाला ऐकूण दोन लाख आत्महत्या होत आहेत. त्यात तरुणांचे प्रमाण अर्ध्याहून अधिक असल्याचे त्यांनी सांगितले. इतर रोगावर ज्या तातडीने उपचार घेतले जातात तितके मानसिक आजारावर घेतले जात नसल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. शेतकरी कीर्तन महोत्सवातून वैचारिक प्रबोधनाबरोबर शेतक-यांच्या आरोग्याची काळजी घेत असल्याबद्दल डॉ. दाभोळकर यांनी समाधान व्यक्त केले.

गुरुदेव संप्रदायाच्या भजनाने शेतकरी श्रोते मंत्रमुगध

शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या दुस-या दिवशीच्या संध्याकाळच्या सत्रात तुकडोजी महाराजांची भजने आणि ग्रामगीतेवर ज्ञानेश्वर दादा रक्षक आणि रवी मानव यांची प्रवचने झाली. गुरूदेव संप्रदायाच्या वतीने केलेल्या सादरीकरणात मोजरी येथील तुकडोजी महाराज गुरूकुलातील विद्यार्थ्यांनी भजने गायली. सहावी ते आठवीच्या वर्गात शिकणा-या या मुलांच्या भजनानी श्रोते मंत्रमुग्ध झाले. रवी मानव ◀◀ पान २ वर

## महाराजा मल्हारराव होळकर जयंती अध्यक्षपदी मंजुळादास कुंडकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरामध्ये मागील बारा वर्षांपासुन मल्हारसेना प्रणित महाराजा मल्हारराव होळकर जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही आयोजन करण्यात आलेले असुन अध्यक्षपदी मंजुळादास कुंडकर, तर सचिवपदी हरी गलांडे ,उपाध्यक्षपदी भगवान धरपडे ,यांची निवडी करण्यात आली आहे.



महाराजा मल्हारराव होळकर जयंती उत्सवानिमीत्त मल्हारराव होळकर जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या जयंती अध्यक्षपदी तालुक्यातील शिंपेटाकळी येथील सामाजिक कार्यकर्ते मंजुळादास कुंडकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी भगवान धरपडे सचिवपदी हरी गलांडे प्रसिद्धी प्रमुख राजेश दंडवते संयोजक विलास नेमाणे आशोक डोणे ,यांचेसह दत्ता मुळे बाबा वगरे आनिल आव्हाड मोहन शिंदे गणेश हजारे दादा ढवळे प्रतमेश बरखडे पंडीत वगरे लिंबाजी आबुज शुभम हजारे नितीन डोणे हनुमान कुंडकर नवनाथ भेटे हनुमान गावड़े गणेश दिवटे हरीशचंद्र कुंडकर बुवाजी जलादे विकास आबुज, यांची सदस्य म्हणुन निवड करण्यात आली आहे.

## सर्वसामान्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची दारे खुली करणार - प्रदीप खाडे

### दिंद्रुड येथील यश इंटरनॅशनल स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

सीबीएसई शिक्षण हे देशातलं सगळ्यात मोठं शिक्षण असून ते ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांना भेटावं म्हणून शाळेची उभारणी केली आहे. बऱ्याच माता–पालकांना हे माहीत नाही की, एनसीआरटीचा सिल्याबस हा देशातल्या फक्त आणि फक्त सीबीएसई बोर्डाच्या शाळेमध्येच घेतला जातो. मेडिकल कॉलेजला गोरगरिबांचे मुलं लागावेत म्हणून प्रत्येक राज्यात सिबीएसई पॅटर्न राबवला जातो. म्हणून सर्वसामान्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची दारे खुली करणार असल्याचे मत परळी चे नाथ शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप खाडे यांनी केले.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील यश इंटरनॅशनल पब्लिक (सिबीएसई) स्कूल च्या वार्षिक स्नेहसंमेलन मेळावा काल



**परिस्थितीमुळे जे शिक्षण आम्हाला घेता आले नाही ते शिक्षण सर्वसामान्याच्या मुलांना मिळवून देणार असा शब्द आई–वडिलांना दिला होता त्यामुळे दिंद्रुड व परिसरातील कोणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करत राहणार.**

**– प्रदीप खाडे, अध्यक्ष – कै. रामभाऊ (अण्णा) खाडे सेवाभावी संस्था.**

(दि२२) शुक्रवारी मोठ्या उत्साहात पार पडला. गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रामध्ये यशाची शिखरे सर करणाऱ्या यश इंटरनॅशनल सिबीएसई स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन बालगोपाळांच्या चित्तथरारक व मनमोहक कलाकृतीने शाळेच्या भव्य प्रांगणात मान्यवर व पालकांच्या उपस्थितीमध्ये काल थाटात संपन्न झाले. या सांस्कृतिक पर्वणीने प्रेक्षक, ◀◀ पान २ वर

## शेकापच्यावतीने शहिद दिनानिमित्त अभिवादन सभा



**माजलगाव । प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी हसत हसत फासावर जाणारे वीर शहीद भगतसिंग, राजगुरू,सुखदेव यांच्या शहिद स्मृतिदिनानिमित्त शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने दि २३ मार्च शनिवार रोजी माजलगाव न्यायालयाच्या परिसरात अभिवादन सभा घेण्यात आली. यावेळी शाहिद भगतसिंग,सुखदेव व राजगुरू यांना विनम्र अभिवादन करताना भाई ॲड नारायण गोले पाटील,भाई मुंजा पांचाळ,भाई श्रीराम शेवाळे,भाई विष्णू शेळके,भाई विनोद हांगे,ॲड.प्रवीण आंबुरे,ऍड उद्धव मोरे,बाहुबली देशमाने,विकास सुरवसे,पवन गायगावे,मंगलनाथ देशमाने,आदेश कदम,प्रसाद अंभोरे,कैलास क्षीरसागर, चंद्रशेखर हाडूळे, सर्जेराव चव्हाण, युवराज कुरे,ढेपे यांच्यासह आदी उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# निवडणूकीतील गैरप्रकारांवर १३५ भरारी पथके आणि १२९ स्थिर सर्वेक्षण पथकांचे लक्ष

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ दरम्यान उमेदवार आणि राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चावर आणि निवडणुकीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्ह्यात १३५ भरारी पथके आणि १२९ स्थिर सर्वेक्षण पथकांची स्थापन करण्यात आली आहेत, अशी माहिती तक्रार निवारण कक्षाद्वारे देण्यात आली आहे.

खर्च संनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अधिनस्त जिल्हास्तरावर समन्वय अधिकारी नेमण्यात आले असून प्रत्येक मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर खर्च पथक नेमण्यात आले आहे. या पथकाचे काम अन्य विविध पथकांच्या समन्वयाने चालते. भरारी पथक (एफएसटी), स्थिर सर्वेक्षण पथक (एसएसटी), व्हिडीओ सर्वेक्षण पथक (व्हिएसटी), व्हिडीओ पाहणी पथक (व्हिव्हिटी), माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती (एमसीएमसी), जिल्हा नियंत्रण कक्ष व तक्रार संनियंत्रण कक्ष आदीदेखील खर्च पथकाला सहकार्य करतात. तसेच त्यासाठी आयकर विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचीदेखील या कामात मदत घेतली जाते. जिल्ह्यातील चार लोकसभा मतदार संघाअंतर्गत २१ विधानसभा मतदार संघात मिळून एकूण १३५ एफएसटी पथक आणि १२९ एसएसटी पथके स्थापन करण्यात आली आहेत. भोर मतदार संघात १५ आणि इतर २० मतदार संघात प्रत्येकी ६ एफएसटी स्थापन करण्यात आली आहेत. तसेच भोर विधानसभा मतदार संघात ९ आणि उर्वरित विधानसभा मतदार संघांमध्ये प्रत्येकी ६ एसएसटी स्थापन करण्यात आली आहेत.

या पथकांद्वारे मतदारांना प्रभावित करण्यासाठीची रोकड, मद्य, तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीस आळा घालणे, आचारसंहिता भंगाबाबत घटनांवर लक्ष देणे, निवडणुकीतील गैरप्रकारांची माहिती घेणे, सिव्हिजिल आणि नियंत्रण कक्षाकडे आलेल्या तक्रारींवर कार्यवाही आदी कामे करण्यात येतात. उमेदवार, राजकीय पक्षांच्या प्रचाराच्या सर्व जाहीर सभा, रॅली यांचे व्हिडीओ चित्रीकरण व्हिएसटीच्या माध्यमातून केले जाते व त्याची पाहणी व्हिव्हिटीकडून केली जाते. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ३ व्हिएसटी आणि २ व्हीव्हीटी नेमण्यात आल्या आहेत. या पथकाची निरीक्षणे खर्च पथकासाठी उपयुक्त ठरतात. एमसीएमसीद्वारे उमेदवारांच्या वृत्तपत्रे तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरात खर्चाचा अहवाल समितीकडे पाठविला जातो. या विविध माध्यमातून उमेदवारांनी दर्शविलेला निवडणूक खर्चाची पडताळणी केली जाते. खर्च दर्शविण्यात आला नसल्यास त्याबाबतची नोटीस देऊन त्याच्या निवडणूक खर्चात समाविष्ट केला जातो.

प्रत्येक विधानसभा मतदार संघासाठी सहायक खर्च निरीक्षक नेमण्यात येतो. केंद्र शासनाच्या आयकर विभाग, केंद्रीय उत्पादन शुल्क विभाग, केंद्रीय लेखापरीक्षा व लेखा विभाग किंवा केंद्रीय सार्वजनिक उपक्रमाचे अधिकाऱ्यांची नेमणूक सहायक खर्च निरीक्षक म्हणून होते. ते विधानसभा मतदार संघातील खर्च तपासणीचे काम योग्य पद्धतीने चालले आहे का याची पाहणी करणे आणि खर्च निरीक्षक व जिल्हा निवडणूक अधिकारी यांना खर्च पडताळणीसाठी सहकार्य करण्याचे काम करतात. तसेच उमेदवारांच्या खर्च नोंदवहीची तसेच शॅडो ऑब्झर्वेशन रजिस्टरचे संनियंत्रण करतात, अशीही माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

# राजकीय पोस्ट डिलीट केल्याच्या कारणावरुन मारहाण, पुणे विद्यापीठातील घटना




**पुणे । प्रतिनिधी**

व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर टाकलेली राजकीय पोस्ट डिलीट केल्याच्या रागातून सात आठ जणांच्या टोळक्याने तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जखमी केले. हा प्रकार शुक्रवारी (दि.२२) दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास पुणे विद्यापीठातील आदर्श कॅन्टीन येथे घडली. याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलीसांनी आठ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अनिल भिमराव फुंदे (वय-२८ रा. जुनी सांगवी, पिंपरी) यांनी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन राम तरपडे, करुण वाकोडे, वैभव दिघे, गणेश काकडे व त्यांच्या इतर तीन ते चार अनोळखी तरुणांवर भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७ व १४९ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्य महितीनुसार, फिर्यादी पुणे विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. आरोपीने व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर टाकलेली राजकीय पोस्ट फिर्यादी यांनी डिलीट केली. याचा राग आल्याने आरोपींनी अनिल यांना फोनकरुन बोलावून घेतले. आरोपींनी पोस्ट डिलीट केल्याच्या रागातून फिर्यादी यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच प्लास्टिकची खुर्ची डोक्यात मारुन जखमी केले. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक संभाजी गुरव करीत आहेत.

# रोहित पवार, युगेंद्र पवार यांना सुरक्षा द्या-खा. सुप्रिया सुळे

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यात तीन दिवसांपूर्वी युगेंद्र पवार यांना अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी जाब विचारला होता. या पार्श्वभूमीवर खासदार सुप्रिया सुळे यांनी आता आमदार रोहित पवार व युगेंद्र पवार यांना तत्काळ सुरक्षा द्यावी अशी मागणी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे केली आहे. सुळे यांनी यासंबंधी जिल्हा पोलिस अधीक्षकांना पत्र दिले आहे. पत्रात नमूद केल्यानुसार लोकसभा निवडणूक प्रचारार्थ आमदार रोहित पवार व युगेंद्र पवार हे दौरे करत आहेत. संविधानिक पद्धतीने, शांतपणे व लोकशाही मार्गाने लोकांशी सुसंवाद साधत आहेत.



परंतु काही ठिकाणी त्यांना दडपशाहीचा सामना करावा लागत आहे. काही लोक घेराव घालून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहेत. या घटनांमुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून जीविताला धोका आहे. पुणे जिल्ह्यात हे अपेक्षित नाही. त्यामुळे योग्य ती खबरदारी घेऊन त्यांना सुरक्षा प्रदान करावी, असे सुळे यांनी पत्रात म्हटले आहे.

प्रचाराच्या निमित्ताने यंदा युगेंद्र पहिल्यांदाच बाहेर पडला आहे. त्याला घेराव घालण्याचे कारण काय असा सवाल सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना केला. ज्यांना कोणाला काही जाब विचारायचा असेल तर त्यांनी मला विचारावा. निवडणूक मी लढते आहे. युगेंद्रच्या बाबतीत जे घडले ते चुकीचे आहे. पोलिसांकडून काही इनपुटस मला आले. त्यामुळे मलाही चिंता वाटली म्हणून मी पोलिसांना पत्र दिल्याचे सुळे यांनी सांगितले.

# राईज एन शाईन च्या 'ब्लू जावा' केळी ला शेतकऱ्यांची पसंती

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात केळीचे उत्पादन घेतले जाते. त्यात सोलापूर जिल्हा गेल्या चार ते पाच वर्षांपासून केळी लागवडीत व उत्पादनात अग्रेसर राहिला आहे. याच सोलापूर जिल्ह्यातील, करमाळा तालुक्यातील एका तरुण इंजिनियरने ब्लू जावा (निळी केळी) या नवीन प्रकारच्या केळीचे यशस्वी उत्पादन घेत देशभरातील व्यापाऱ्यांना आपल्या बांधावर येण्यास भाग पाडले आहे. निळ्या रंगाची केळी ही तिच्या रंगातील व चवीतील वेगळेपणामुळे ओळखली जाते. याचमुळे या केळींना फार मोठी मागणी आहे. आपल्या शेतातील ऋ-९ (ग्रँड नाईन) ते राईज एन शाईन बायोटेक प्रा. लि. पुणे या कंपनीकडून घेत असताना, कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ भाग्यश्री प्रसाद पाटील ह्यांनी श्री अभिजीत पाटील ह्यांना निळी केळी लागवड करण्यास प्रोत्साहन दिले तसेच कंपनीचे फार्म ऑपेरेशन मॅनेजर श्री अमेयदादा पाटील ह्यांनी लागवडीपच्यात लागणाऱ्या मदतीची हमी दिली व मार्गदर्शन केले.

त्याबाबतची माहिती ऐकून अभिजीत यांची जिज्ञासा जागी झाली आणि त्यांनी याबाबत अधिक जाणून घेण्यास सुरुवात केली. मोठमोठ्या शहरातील फाईव्ह आणि सेव्हन स्टार हॉटेल्स व मोठ्या मॉलमध्ये या केळीची १०० रुपये किलो दराने विक्री होत असल्याचे त्यांना समजले. यातून




प्रेरणा घेऊन श्री अभिजीत पाटील यांनी ब्लू जावा केळी करमाळा तालुक्यातील वाशिंबे इथल्या आपल्या शेतात लावण्याचा निर्णय घेतला. राईज एन शाईन बायोटेक प्रा. लि. या कंपनीनेच शेतकऱ्यांना उच्च परतावा देणाऱ्या रेड बनाना (ठशव इरपरपर) म्हणजेच लाल केळी आणि वेलची केळी (धशश्रश्नज्ञळ इरपरपर) हे वाण उपलब्ध करून दिले. या दोन प्रकारात देशातील तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांचे वर्चस्व होते. ते कंपनीच्या मदतीने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी मोडीत काढले. आता कंपनीकडे परदेशातून सुद्धा या केळीच्या रोपांची मागणी वाढतेय.

ब्लू जावा केळी, ज्याला आईसक्रीम केळी किंवा व्हॅनिला केळी म्हणूनही ओळखले जाते, या वाणाची निर्मिती दक्षिण पूर्व आशियामध्ये झालेली असून, हे फळ खूप खास आहे. या फळाची चव व्हॅनिला आईसक्रीम सारखी आहे. श्री. अभिजीत पाटील हे एक प्रगतिशील शेतकरी असून, त्यांनी शेतीत नवनवीन प्रयोग करण्याकडे विशेष लक्ष केंद्रित केले आहे. ते लाल केळी, ड्रॅगन फ्रूट, सफरचंद या सारख्या अनोख्या पिकांची जोपासना करण्यात आघाडीवर आहेत. श्री. पाटील ह्यांनी आता ब्लू जावा केळीची दोन एकर क्षेत्रामध्ये लागवड केली आहे, आणि पुणे येथील ' राईज एन शाईन ' बायोटेक प्रा. लि. कडून मिळालेल्या रोपांच्या गुणवत्तेमुळे ते अत्यंत समाधानी आहेत. त्यांच्यासोबतच केळीरत्न श्री कपिल जाचक व इतर अनेक शेतकऱ्यांनी ह्या वाणाची प्रायोगिक तत्वावर लागवड करून यशस्वी उत्पादन घेतले आहे. निळ्या केळीमध्ये अनेक पोषक अन्नद्रव्य असल्याचे मानतात. सुरवातीला निळसर हिरवी दिसणारी हि केळी परिपक्व झाल्यांनतर पिवळी होतात. केवळ ५ ते ६ इंच लांबी आणि आकाराने गोलसर असणाऱ्या निळ्या केळीचा स्वाद अगदी व्हॅनिला फ्लेवर प्रमाणे असतो. दरम्यान शेतकऱ्यांना व्यवसायिक शेती करण्यासाठी उच्च उत्पादन देणारी रोपे देण्यास व त्यांचे संगोपन व वाढीसाठी मार्गदर्शन करण्यास राईज एन शाईन बायोटेक प्रा लि कंपनी कटीबद्ध आहे. प्रगतिशील शेतकऱ्यांच्या पाठीशी कंपनी नेहमी खंबीरपणे उभी राहील असे मत कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ भाग्यश्री पाटील ह्यांनी ह्या प्रसंगी व्यक्त केले.

# शहीद दिनानिमित्त महानगरपालिकेच्या वतीने शहीद भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव यांना अभिवादन



**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहीद दिनानिमित्त भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील थोर क्रांतिकारक शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या पिंपरी येथील मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रतिमेस तसेच दापोडी येथील शहीद भगतसिंग यांच्या पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास महानगरपालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, तसेच विविध विभागातील कर्मचारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# ज्या कुटुंबामध्ये महिलांना आर्थिक स्वातंत्र्य ते कुटुंब सक्षम-स्नेहल पटवर्धन

**पिंपरी । प्रतिनिधी**

ज्या कुटुंबामध्ये महिलांना आर्थिक स्वातंत्र्य दिले आहे ते कुटुंब सक्षम पणे स्थिरस्थावर झाल्याचे दिसते. योग्य आर्थिक व्यवस्थापन करून बदलत्या काळातील नवतंत्रज्ञान आत्मसात करीत आपल्या कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीसाठी पुरुषांबरोबरच महिलांनी देखील सहभाग घेतला पाहिजे. अनुभवी सल्लागार यांच्या मार्गदर्शनाखाली सुयोग्य नियोजन केले तर प्रत्येकाला सुरक्षित आर्थिक उद्दिष्ट गाठता येते असे प्रतिपादन श्रीनिवास होल्डिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे संचालक स्नेहल पटवर्धन यांनी केले.



श्रीनिवास होल्डिंग प्रा. लि. कंपनीचा ग्राहक मेळावा संपन्न

श्रीनिवास होल्डिंग प्रा. लि. कंपनीच्या ग्राहक आणि हितचिंतकांचा ग्राहक मेळावा शुक्रवारी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी कंपनीच्या वतीने 'बदलत्या काळाची गुंतवणूक इन्व्हेस्टमेंट विषयी थोडक्यात' या माहिती पुस्तिकेचे वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. जगदीश ढेकणे, आनंद मुथा, मुकुंद नेहारकर, कंपनीचे संचालक सुहास गनबोटे, अरुणा गनबोटे, स्नेहल पटवर्धन व गायक चैतन्य कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी चैतन्य कुलकर्णी व सह कलाकारांनी हिंदी, मराठी चित्रपट व पारंपारिक गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

ओंकार पटवर्धन यांनी आर्थिक व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन करताना सांगितले की, आर्थिक नियोजन हा खूप मोठा आणि कधीही न संपणारा विषय आहे. यामध्ये बरेच टप्पे आहेत. पण कुठून तरी सुरुवात होणे महत्त्वाचे आहे. बाजारामध्ये अनेक गुंतवणुकीचे पर्याय उपलब्ध आहेत. गुंतवणूक करताना त्या गुंतवणुकीची सुरक्षितता, तरलता, कर, परतावा, अनुकूलता आणि गुंतवणुकीची वेळ याचा प्राधान्याने विचार करावा. सुरक्षिततेसाठी आयुर्विमा, अपघात विमा, तसेच अचानकपणे उद्भवणाऱ्या वैद्यकीय उपचारांसाठी राखीव निधी, दीर्घकालीन ठेव योजना, आवर्तक ठेव योजना, एसआयपी (पद्धतशीर गुंतवणूक योजना), एसडब्लूपी याबाबत माहिती घ्यावी. आधी घर घ्यावे की म्युच्युअल फंडात गुंतवणूक करावी. निवृत्तीनंतरची आर्थिक गरज याविषयी ओंकार पटवर्धन यांनी चित्रफितीद्वारे मार्गदर्शन केले. श्रीनिवास होल्डिंग प्रा. लि. कंपनीच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्व म्हणून लायन्स क्लब ऑफ चिंचवड या संस्थेला लवळे येथील डेंटल क्लिनिक मधील गरीब रुग्णांना सेवा देण्यासाठी आर्थिक मदतीचा धनादेश देण्यात आला. निवडक ग्राहकांनी आपले कंपनीच्या सेवा सुविधा विषयी मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.स्वागत स्नेहल पटवर्धन, सूत्रसंचालन आणि आभार प्राजक्ता मांडके यांनी मानले

# 'निर्भया'ला मिळाला न्याय!

## कोथुर्णेतील हत्येप्रकरणी नराधमाला फाशी, तर आरोपीच्या आईला ७ वर्षांचा कारावास

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात २ ऑगस्ट २०२२ रोजी कामशेत जवळच्या कोथुर्णे गावात जिल्ह्याला हादरवणारा प्रकार घडला होता. अवघ्या ६ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करुन तिची निघृण हत्या करण्यात आली होती. कामशेतचे प्रभारी पोलीस निरीक्षक संजय जगताप यांनी शिताफीने तपास करून आरोपी तेजस उर्फ दादा महिपती दळवी (वय २४) याला ताब्यात घेतले. दुर्दैवाची गोष्ट अशी की, यात निष्पाप बालिकेचा मृतदेह लपविण्यात तेजसची आई त्याला सामील होती. तत्कालीन अपर पोलीस अधीक्षक मिलिंद मोहिते यांनी सुरुवातीला व नंतर तत्कालीन अपर पोलीस मितेश घट्टे तपासकामी पर्यवेक्षण केले होते. तत्कालीन पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी फास्ट ट्रॅक कोर्टात सुनावणी होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांतून शुक्रवारी (दि.२२) आरोपी तेजसला फाशी व त्याच्या आईला पुरावा नष्ट करण्यासाठी मदत केल्याबद्दल ७ वर्षांचा कारावासाची शिक्षा सुनावून 'निभया'ला न्याय दिला.

आरोपींना शिक्षा सुनावण्यात पूर्वी न्यायालयाने आरोपीचे म्हणणे ऐकून घेतले. मात्र त्याच्या चेहऱ्यावर पश्चातापाचा लवलेशही नव्हता. मी हा गुन्हा केलाच नाही, असे आरोपी सांगत होता. न्यायालयाने त्याला गुन्हा सिद्ध झाल्याचे सांगितले. याप्रकरणी जलद गतीने सुनावणी घेऊन विशेष न्यायाधीश बी.पी. क्षीरसागर यांनी हा निकाल दिला. तेजस ऊर्फ दादा महिपती दळवी (वय-२४) असे फाशी झालेल्या नराधमाचे नाव आहे, तर सुजाता महिपती दळवी (वय ४८, दोघेही रा. कोथुर्णे, पवननानगर, मावळ) असे त्याच्या आईचे नाव आहे. याबाबत चिमुकलीच्या वडिलांनी कामशेत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती.

घटनेच्या दिवशी नेमकं काय घडलं?

ही घटना २ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी घडली होती. त्या दिवशी नागपंचमीनिमित्ताने शाळेला सुट्टी असल्याने चिमुकली घरासमोर खेळत होती. अचानक ती बेपत्ता झाल्याने गावात शोधाशोध सुरू झाली. याबाबत पीडित मुलीच्या वडिलांनी पोलिसांकडे तक्रार केली. घटनेचे गांभीर्य ओळखून कामशेत पोलिसांनी गावात शोधमोहीम राबविली. दुसऱ्या दिवशी (३ ऑगस्ट) दुपारच्या सुमारास गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या मागे झुडुपात मुलीचा मृतदेह आढळून आला.

तपासात तिच्यावर लैंगिक अत्याचार करून हत्या केल्याचे समोर आले.

पोलिसांनी तपासाची सूत्रे फिरवून चोवीस तासांत चिमुकलीच्या शेजारी राहणाऱ्या तेजस दळवीला अटक केली. पोलिसांच्या चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. सरकारी वकील अ‍ॅड. राजेश कावेडिया यांनी तपास पथकाची बाजू शिवाजीनगर, पुणे कोर्टात प्रभावीपणे मांडली. त्यांनी एकूण २९ साक्षीदार तपासले. बचाव पक्षातर्फे ड. यशपाल पुरोहित यांनी काम पाहिले. कामशेत पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक संजय जगताप, पोलीस उपनिरीक्षक प्रियंका माने, सुरेखा शिंदे, सहायक पोलीस उपनिरीक्षक आदींनी या प्रकरणाचा तपास करुन आरोपीला तात्काळ अटक केली होती. या खटल्याची सुनावणी दीड वर्षापासून सुरु होती. न्यायालयाच्या निकालानंतर सहायक पोलीस अधीक्षक, लोणावळा विभाग सत्यसाई कार्तिक म्हणाले, हा गुन्हा अत्यंत संवेदनशील होता. हे लक्षात घेऊन कामशेत पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी बारकाईने तपास केला. तपासात कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत, याची दक्षता पोलिसांनी घेतली. त्यामुळे आरोपीला फाशीची शिक्षा झाली. पोलिसांच्या कामगिरीला यश आले.

# कामगार ठेवताना 'पोलीस क्लियरन्स' बंधनकारक

## वाढती गुन्हेगारी आणि त्यातील परप्रांतीयांच्या सहभागामुळे पोलीस आयुक्तांनी काढला आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवड आणि आसपासच्या एमआयडीसीमधील सर्व प्रकारच्या कंपन्यांना कामगार ठेवताना त्यांचे पोलीस क्लियरन्स सर्टिफिकेट काढून घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. शहरासह राज्यात घडणाऱ्या विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये परप्रांतीय तरुणांचा सहभाग असल्याचे आत्तापर्यंतच्या पोलीस तपासात समोर आले आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी हे आदेश दिले आहेत. तसेच या आदेशाचा भंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे.




उद्योगनगरी अशी ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात लाखोंच्या संख्येने परप्रांतीयांचे वास्तव्य आहे. बहुतांश नागरिक कामाच्या शोधात शहरात दाखल झाले आहेत. मात्र, ठेकेदार, मालकांकडून त्यांच्या नोंदी घेतल्या जात नव्हत्या. नोंदी नसल्यामुळे कायदेशीर कारवाई करताना पोलिसांना अनेक अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी कलम १४४ क्रिमिनल प्रोसिजर कोड - १९७३ अंतर्गत एक आदेश काढला आहे. त्यानुसार, प्रत्येक कामगाराचे पोलीस क्लियरन्स सर्टिफिकेट काढणे बंधनकारक असणार आहे. गेल्या काही काळात पिंपरी-चिंचवड शहरात खून, खुनाचा प्रयत्न, अल्पवयीन मुलींसोबत अनैसर्गिक अत्याचार असे गंभीर गुन्हे घडले आहेत. या गुन्ह्यांतील आरोपी परप्रांतीय असून कामाच्या शोधात शहरात आलेले होते. उसाचे गुऱ्हाळ, कंपनी किंवा ठेकेदारी तत्त्वावर हे लोक काम करत होते. मात्र, हे काम करत असलेल्या आस्थापनांच्या मालकांनी या कामगारांची माहिती घेतलेली नव्हती. त्यांची कोणत्याही प्रकारची नोंदणी तसेच पोलीस व्हेरिफिकेशन केले नव्हते. त्यामुळे गुन्हा घडल्यानंतर गुन्हेगारांना पकडताना तसेच त्यांच्यावर कारवाई करताना पोलिसांना अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी पोलीस क्लियरन्स सर्टिफिकेट काढणे बंधनकारक केले आहे. सर्व प्रकारचे कामगार, कंत्राटदार, रोपवाटिका मालक, वनस्पती वितरक, सुरक्षा रक्षक एजन्सी आणि सर्व प्रकारचे कुशल आणि अकुशल मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या एजन्सीला हा नियम लागू असणार आहे. एकंदरीतच सर्व प्रकारच्या कामगारांना पोलीस क्लियरन्स सर्टिफिकेट अनिवार्य असणार आहे. पोलीस क्लियरन्स प्रमाणपत्र प्राप्त होत नाही तोपर्यंत नवीन कामगारांना कामावर ठेवता येणार नाही. तसेच, या आदेशानुसार जुन्या कामगारांचीही पोलीस पडताळणी करणे बंधनकारक आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील रहिवासी भागात, प्रार्थनास्थळांमध्ये तात्पुरता, खासगी रोजगार घेऊन देशविघातक कृत्य करणारे तरुण लपून राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आपल्याकडे काम मागण्यास आलेल्या कामगारांची इत्थंभूत माहिती घेणे आवश्यक आहे. कामगारांवर देशभरात कोणत्याही स्वरूपाचे गुन्हे आहेत का याची पडताळणी याद्वारे केली जाते. त्यानंतर माहितीच्या आधारे पोलीस क्लियरन्स सर्टिफिकेट दिले जाते.

pcs.mahaonline.gov.in या वेबसाईटवरून पोलीस क्लियरन्स सर्टिफिकेट प्राप्त करता येणार आहे. त्यासाठी वेबसाईटवर कागदपत्र अपलोड करावे लागणार आहेत. कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर ऑनलाईन पोलीस क्लियरन्स सर्टिफिकेट मिळवता येणार आहे.